# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे.

नोंदणी क्र. पीएनए / जिउनी (शहर) / जीएनएल / (ओ) / १५७/२०२०-२१/सन-२०२१ दि. २९/९/२०२१

अध्यक्ष : डॉ. मोरेश्वर सुखदेवे | उपाध्यक्ष : प्रा. गौतम मगरे


दिनांक : १०/१०/२५

जा.क्र.बो धि स रु म / २०२५-२६/५२

## बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे च्या अधिमंडळाची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा

## इतिवृत्तान्त

## दिनांक ०५ सप्टेंबर २०२४

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित, पुणे च्या अधिमंडळाची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता. "पुणे इंटरनॅशनल स्कूल, टिंगरे नगर, विद्यानगर, लेन नंबर १४", पुणे, येथे आयोजित करण्यात आली.दुपारी ठीक २.३० वाजता. सभेसाठी आवश्यक कोरम असल्यामुळे उपस्थित संचालकांनी प्रथम तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अधिमंडळाच्या सभेची सुरुवात करण्यात आली. सभेला एकूण ११२ सभासद उपस्थित होते.

बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे नवनिर्वाचीत संचालक डॉ.सारीपुत्त नवघरे यांनी सन्माननीय सभासदांचे स्वागत केले.सन २०२५-३० या कालावधी करिता निवडून आलेल्या सर्व नवनिर्वाचित संचालकांची ओळख सभेत उपस्थित असलेल्या सभासदांना करून देण्यात आली.अधिमंडळाच्या चौथ्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष स्थान मा. प्रा. गौतम मगरे यांनी करावे असा प्रस्ताव संचालक डॉ. सारीपुत्त नवघरे यांनी मांडला व त्यास डॉ.जगन्नाथ रायभोळे यांनी अनुमोदन केले.

बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे नवनिर्वाचीत संचालक डॉ.सारीपुत्त नवघरे यांनी मनोगत व्यक्त केले.. "समाजाचे स्वतःचे रुग्णालय असावे अशी संकल्पना व स्वप्न घेऊन माननीय संचालक आपल्यासमोर आले व आपल्या स्वप्नातील रुग्णालयाची संकल्पना प्रत्यक्षात अस्तित्वात आणण्याकरिता प्रयत्न करत आहे. संचालक मंडळांने आज पर्यंत कमीत कमी २० पेक्षा जास्त जागांचा शोध रुग्णालयाकरिता घेतला आहे. जागेसाठी व शासकीय निधी प्राप्त करण्यासाठी विविध पातळीवर जाऊन पाठपुरावा करणेत आला आहे. भाडेतत्त्वावर दापोडीतील रूग्णालय कार्यान्वित केले. स्वबळावरील रूग्णालय करण्यासाठी प्रयत्न करत आहे. संचालक मंडळाने केलेल्या अनेक उपक्रमातील गोष्टी सभासदांपर्यंत पोहोचविता येत नाही. प्रत्येक वेळी सभासदांच्या ग्रुप वर गोष्टी टाकणे शक्य होत नाही. पण आपण केलेले काम आज ना उद्या सभासदांपर्यंत पोहोचेल. सभासदांपर्यंत ब-याच गोष्टी न पोहोचल्यामुळे ब-याचशा सभासदांमध्ये संस्थेत काय चालू आहे याबाबत शंका - कुशंका मनामध्ये निर्माण होत आहेत. मात्र शंका - कुशंका सभासदांनी मनात न ठेवता स्वप्न साकारणेसाठी संचालक मंडळास सर्वतोपरी सहकार्य करणे आवश्यक आहे.


पुणे इंटरनॅशनल स्कूल, लेन नं. १४, आदर्श नगर, विद्यानगर, टिंगरेनगर, पुणे – ४११०३२.

Email : bodhisatva29@gmail.com संपर्क : ९०९६७९४९३९

डॉ.सारीपुत्त नवघरे यांनी अधिमंडळाच्या चौथ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची विषय सूची सभेपुढे वाचून दाखवली व सभेच्या अध्यक्षांना सभेस सुरुवात करण्याची विनंती केली.

सभेचे अध्यक्ष मा. प्रा. गौतम मगरे यांनी सर्व सन्माननीय सभासदांचे तसेच संचालक मंडळातील सदस्यांचे स्वागत केले. दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी पाठविण्यात आलेल्या अधिमंडळाच्या वार्षिक सभेपुढील विषयांवर खालील प्रमाणे चर्चा करून ठराव करण्यात आले.

**विषय क्रमांक १: दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या संस्थेच्या तिसऱ्या अधिमंडळाच्या "वार्षिक सभेचा" इतिवृत्तांत कायम करणे.**

सन्माननीय सभासद बळीराम बडेकर यांनी इतिवृत्त वाचन करावे असे प्रतिपादन केले.इतिवृत्ताचे वाचन सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी केले.इतिवृत्ताचे वाचन झाल्यानंतर संस्थेचे सभासद आयु. रवींद्रनाथ बडेकर यांनी एक सूचना केली की, अध्यक्ष महोदयांनी अधिमंडळाच्या तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले. परंतु इतिवृत्ताची प्रत अहवालामध्ये छापण्यात यावी जेणेकरून पुढील वर्षी इतिवृत्त वाचण्याकरिता लागणाऱ्या वेळेची बचत होईल. आयु. रवींद्रनाथ बडेकर यांनी केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आली व पुढील वर्षी याचा विचार करण्यात येईल असे आश्वासन सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी केले.

आयु. रवींद्रनाथ बडेकर यांनी सभेचा प्रोटोकॉल विचारात घेऊन अहवाल कालावधीत संस्थेचे दिवंगत सभासद तसेच त्यांचे कुटुंबीय, संस्थेचे हितचिंतक, विचारवंत, ज्ञात व अज्ञात व्यक्ती या सर्वांसाठी २ मिनिट स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहण्यात यावी अशी विनंती केली व या विनंतीनुसार सभेचे अध्यक्ष व सभागृहातील उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे ची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आली होती. सभेचे इतिवृत्त सभासदांचे सर्व ग्रुप वर व्हाट्सअपद्वारे पाठवले होते. त्याचप्रमाणे सदर इतिवृत्त संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले होते. सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभासदांना वाचून दाखविले आहे व या सभेत झालेल्या निर्णयावर केलेली कार्यवाही अध्यक्षांनी सभेपुढे सादर केली. सभासदांनी इतिवृत्त तसेच निर्णय यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या तिसऱ्या वार्षिक सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले व निर्णयावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेऊन सर्वानुमते इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**ठराव क्रमांक १ : दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या संस्थेच्या अधिमंडळाच्या तिसऱ्या वार्षिक सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता.**

**ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.**

सूचक: मा. रवींद्रनाथ बडेकर
अनुमोदक:मा. सुनील शिंदे

**विषय क्रमांक २: संस्थेच्या ३१ मार्च २०२५ अखेरच्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.**

सन्माननीय सभासद आयु. रवींद्रनाथ बडेकर, आयु. संजय जांभुळकर, आयु. कैलास पाटील व आयु. संजय उबाळे यांच्याकडून प्रश्न मिळाले होते. आयु..बडेकर यांना लेखी उत्तर

बोधिसत्व सहकारी ... पुणे

पाठविल्याचे नमूद केले. आयु. संजय जांभुळकर, आयु. कैलास पाटील व आयु. संजय उबाळे यांच्याकडून प्राप्त पत्राच्या संदर्भात सर्वसाधारण सभेत प्रश्न विचारण्यात येणार असे नमूद केले होते. त्यानुसार त्यांच्या प्रश्नांना उत्तरे सभेत देण्यात आली.

सन्माननीय सभासद आयु.जयद्रथ आत्माराम आखाडे यांनी संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. पाच कोटी व संस्थेचे वसूल भाग भांडवल रु. १,९५,२०,०००/- हे दोन्ही मिळून संस्थेकडे भाग भांडवल आहे का? अशी विचारणा केली असता. प्रा. गौतम मगरे यांनी संस्थेची नोंदणी करताना उपविधीमध्ये संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. पाच कोटी असेल व या पाच कोटी मधून सध्या संस्थेकडे वसूल भाग भांडवल रु. १,९५,२०,०००/- आहे असे सांगण्यात आले. त्यावर त्यांनी संस्थेकडे रु.१,९५,२०,०००/- जमा असतील तर ते बँकेमध्ये मुदत ठेवी त ठेवले आहेत का? असल्यास त्याचे व्याज मिळते का? जर व्याज प्राप्त होत असे तर ती रक्कम आपण कोठे ठेवली आहे ? असा प्रश्न उपस्थित केले. डॉ.आनंद जोगदंड यांनी संस्थेचे अधिकृत भाग भांडवल व वसूल भाग भांडवल याचे स्पष्टीकरण दिले.अधिकृत भाग भांडवल म्हणजे संस्था स्थापन करताना जो उपविधी तयार करण्यात आला. उपविधीतील तरतुदीप्रमाणे रु. पाच कोटी भाग भांडवल उभारावयाचे असून ते एका शेअर्सची किंमत रु. पाच हजार असे पाच हजाराप्रमाणे शेअर्स घेऊन. आपण जास्तीत जास्त भाग भांडवल रु. पाच कोटीपर्यंत उभारणार आहोत असे उपविधीमध्ये नमूद केले आहे. त्याच अनुषंगाने ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेस रु १,९५,२०,०००/- भाग भांडवल जमा झालेले आहे.

रु १,९५,२०,०००/- मधून रु १,७०,२१,८८५.९० रुपयाची मुदत ठेव वेगवेगळ्या बँकेमध्ये करण्यात आलेली आहे. बँकेमधून प्राप्त होणाऱ्या व्याजासकट रक्कम पुन्हा बँकेत मुदत ठेवीमध्ये ठेवली जाते. संस्थेच्या चालू खात्यात रु. १०,५९,८५९.९० आहेत असे संस्थेकडे एकूण रु.१,८०,८१,७४५.८०/-जमा आहेत.संस्थेला मागील आर्थिक वर्षात रु.१२,०७,९१६.०० मुदत ठेवीवरील व्याज प्राप्त झाले आहे. ही सर्व माहिती आर्थिक पत्रकांसह सभासदांचा व्हाट्सअप वर असणाऱ्या ग्रुप वर तसेच संस्थेच्या वेबसाईटवर देण्यात आली होती. वार्षिक अहवालाची प्रत सर्व सभासदांना पोस्टाच्या माध्यमातून पाठविणे खर्चिक असल्या कारणास्तव ही प्रत सभासदांना सभेपूर्वी देण्यात येईल असे अधिमंडळाच्या तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठरविण्यात आले होते.

सन्माननीय सभासद आयु. शंकर गायकवाड यांनी दिनांक २६ ऑगस्ट २०२५ पूर्वी मागविण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावी, यापासून सभेची सुरुवात व्हावी असे मत मांडले. परंतु सभेचे अध्यक्ष प्रा. मगरे यांनी सभेची विषय सूची आपणास दिल्याप्रमाणे,नियमानुसार व विषयानुसार सभेचे कामकाज चालू राहील व विषयानुसार लेखी आलेलया प्रश्नांची ऊत्तर देत आहे असे सांगीतले.

सन्माननीय सभासद आयु.संजय भीमराव उबाळे यांनी विचारणा केली की, आपण जो अहवाल सभेपुढे सादर करत आहोत तो अहवाल सन २०२४-२५ चा आहे या कारकीर्दीत संचालक असणारे व्यक्ती आज सभेस का उपस्थित नाही ? अहवाल कारकीर्दीमध्ये दाखविण्यात आलेली तोट्याची रक्कम ही छपाई मध्ये छोटी दिसत असल्याकारणाने समजून येत नाही तर कृपया याची माहिती विशद करावी.

डॉ.आनंद जोगदंड यांनी अहवालाचे अवलोकन करावे. पान क्रमांक १४ ऑडिटेड नफा-तोटा पत्रका नुसार संस्थेला सन २०२४-२५ मध्ये रु.१९,२६,०२५.०५ तोटा झालेला आहे.

सन्माननीय सभासद आयु.संजय उबाळे यांनी मी पुन्हा विचारणा करतो की, अहवाल काळातील संचालक आज सभेसाठी का उपस्थित नाहीत? यावर सभेचे अध्यक्ष प्रा. मगरे यांनी सांगितले की. ही सभा सर्व सभासदांकरिता आहे. सभासदांनी सभेस उपस्थित रहाणे ,उपविधीतील तरतुदीनुसार अनिवार्य आहे.सर्व सभासदांना सभेला येण्याकरीता विनंती केलेली आहे. माजी संचालकांनी सभेस येणे न येणे ही त्यांची स्वतःची वैयक्तिक जबाबदारी आहे.

सन्माननीय सभासद आयु.संजय उबाळे यांनी संस्थेला झालेला एकूण तोटा रु.१९,२६,०२५.०५ या बाबतची माहिती विषद करावी.

डॉ.आनंद जोगदंड यांनी संस्थेला झालेला एकूण तोटा हा दापोडी हॉस्पिटल वरील खर्चामुळे झाला आहे.एकूण खर्च रु.४६,३७,४४५.४० झाला असून, एकूण उत्पन्न फक्त रु. ८,९१,७४८.१४ झाले आहे. दापोडी हॉस्पिटलचा लाभ संस्थेच्या बोटावर मोजणे एवढ्या सभासदांनी घेतलेला आहे. दापोडी रूग्णालयाचा एकूण वर्षभरात (जून २०२४ ते मार्च २०२५) फक्त ११४४ रुग्णांनी सेवेचा लाभ घेतला आहे. हा लाभ बिगर सभासदांनी ओपीडी आणि आयपीडी च्या माध्यमातून घेतलेला आहे.

आयपीडी सेवेचा लाभ १०४ रुग्णांनी घेतला आहे. ज्या सभासदांसाठी आपण हे भाडेतत्वावरील रुग्णालय सुरू केले त्या सभासदांचा रुग्णालयाला प्रतिसादच नाही. एकूण बारा सभासदांनीच या रुग्णालया च्या सेवेचा लाभ घेतलेला आहे. यामध्ये पाच संचालक आहेत व सात सभासद आहेत. जे उद्देश ठेवून आपण हे रुग्णालय सुरू केले होते तो उद्देश सभासदांचा प्रतिसाद न मिळाल्यामुळे उत्पन्न कमी झाले आहे. प्रतिसाद नसला तरीही रुग्णालयात डॉक्टर,नर्सेस, इतर कर्मचाऱ्यांचे वेतन, भाडे, लाईट बिल इतर खर्च हा चालूच होता.

सभासदांच्या माहितीकरिता मी डॉ.आनंद जोगदंड प्रकर्षाने सांगू इच्छितो की, दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल चालू करण्याकरिता माझा वैयक्तिकरित्या विरोध होता, परंतु सर्व सन्माननीय संचालकांची इच्छा असल्यामुळे हे रुग्णालय चालू करण्यासाठी प्रत्येक संचालकांनी रु.२,५०,०००/-अनामत रक्कम ठेवावी असा संचालकांच्या बैठकीत मी विचार मांडला होता. त्यास अनुसरून संचालकांनी चर्चे अंती रु.१,००,०००/- अनामत रक्कम ठेवावी असा ठराव मान्य केला. या मागील उद्देश एवढाच होता की, हॉस्पिटल साठी लागणारा निधी हा संस्थेच्या निधी मधून खर्च न होता. संचालकांच्या अनामत रक्कमे मधून होईल व यामधून संस्थेला तोटा सहन करावा लागणार नाही.

संचालकांनी मान्य केलेल्या ठरावानुसार रु.१०,९५,०००/-संस्थेस अनामत ठेव म्हणून देण्यात आली, तसेच सन्माननीय सभासद आयु. पेशव कवाडे यांनी रु.१,००,०००/-अनामत रक्कम संस्थेत ठेव म्हणून ठेवली आहे. एकूण प्राप्त अनामत ठेव रु.११,९५,०००/- मधून रुग्णालय चालू करण्याचा संस्थेचा मानस होता. परंतु रुग्णांचा प्रतिसाद नसल्यामुळे आणि संचालक मंडळातील डॉ.गायकवाड डॉ.आयरेकर, डॉ.बेंडे यांच्या म्हणण्यानुसार काही काळ आपल्याला हॉस्पिटल अशाचपद्धतीने चालवावे लागेल.या डॉ.संचालकांच्या मतानुसार रुग्णालय काही काळ चालू ठेवण्यात यावे,लगेचच नफा मिळणार नाही ,निधी हा खर्च करणेसाठीच आहे असे मत होते. मात्र संस्थेचा निधी दापोडी रूग्णालयावर खर्च करू नये असे मी माझे मत मांडले होते व आजही आहे. डॉ.संचालकांच्या मतानुसार रूग्णालय चालु ठेवले व त्याचाच परिपाक म्हणून संस्थेस प्राप्त झालेले उत्पन्न (ठेवीवरील व्याज, सभासद फी, दान, शिबिरावरील उत्पन्न) झालेल्या खर्चातून वगळता संस्थेला सन २०२४-२५ मध्ये एकूण रु.१९,२६,०२५.०५ तोटा झालेला आहे.

सन्माननीय सभासद आयु.संजय उबाळे यांचा पुढील प्रश्न दापोडी रुग्णालय किंवा टिंगरे नगर येथील रुग्णालय येथे एकूण रु.१८,४६,०२०/-एवढा खर्च सॅलरी व अलावस यावर झालेला आहे. सॅलरीवर झालेला खर्च हा कर्मचाऱ्यांवर झालेला असल्यास किती कर्मचारी नेमण्यात आले होते ? रेंट वर रु.१४,३०,०००/- खर्च दिसत आहे ? एखादा प्रोजेक्ट करण्याकरिता पदाधिकाऱ्यांनी हट्ट धरला असेल तर तो नागरिकांसाठीच असेल, नागरिकांच्या कल्याणाकरिता केला असेल पण जर हा प्रोजेक्ट तोट्यात जात असेल तर यावर काही नियोजन संस्थेने केले आहे का? नियोजनबद्ध काम करणे गरजेचे आहे. एखादे धोरण आखताना कोणत्या प्रकारचे धोरण आपण आखत आहोत याबद्दल माहिती सभागृहाला देण्यात यावी?

सभासदांना आरोग्य सेवा देण्यात यावी या एकमेव उद्देशाने संचालक मंडळाने दापोडी रुग्णालय भाडेतत्त्वावर चालू करण्याचा निर्णय घेतला. डॉ.काळे यांचे तेथे रुग्णालय चालू होते.

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. बोधिसत्व पुणे

तत्कालीन संचालक मंडळातील संचालक डॉ. पी टी गायकवाड, डॉ. मंगल आयरेकर डॉ, उज्वला बेंडे व आयु.सुर्यवंशी यांनी दापोडी रुग्णालय चालू करण्याकरिता आग्रह धरला.ज्या उद्देशाने संस्थेची नोंदणी झालेली आहे ते उद्देश साध्य करण्याकरिता आपण दापोडी रुग्णालय चालू करण्याचा प्रयत्न केला. दापोडी हॉस्पिटल चालू करताना तीन शिफ्ट मध्ये तीन डॉक्टर्स असावेत असे संचालक मंडळातील डॉक्टरांचे मत होते. त्यानुसार दापोडी रुग्णालयामध्ये तीन शिफ्ट मध्ये तीन डॉक्ट कायमस्वरूपी नोकरीत होते, तसेच प्रत्येक शिफ्ट मध्ये एक नर्स म्हणजेच तीन शिफ्ट मध्ये तीन नर्सेस कायमस्वरूपी नोकरीत होते, तीन सफाई कर्मचारी असा एकूण नऊ कर्मचाऱ्यांचा स्टाफ दापोडी रुग्णालयामध्ये होता. सॅलरी व अलावंस यावर झालेला खर्च हा दापोडी रूग्णालय येथील कर्मचाऱ्यांवर होता. दापोडी रुग्णालय हे २५०० स्क्वेअर फिट मध्ये आहे तेथील माहे भाडे रु.१,१०,०००/-आहे. रुग्णालयास आवश्यक असणारी यंत्रसामग्री, एसी, ऑपरेशन टेबल, फर्निचर, इन्स्टुमेंट,इक्विपमेंट इत्यादी गोष्टी खरेदी करण्याकरिता संस्थेने कोणताही खर्च केलेला नाही या सर्व गोष्टी दापोडी रुग्णालयामध्ये आपणास विना मोबदला वास्तुमालकांकडून प्राप्त झालेल्या आहेत. रूग्णालयावर लागणारा खर्च कमीत कमी करण्याचा प्रयत्न संचालक मंडळाने केलेला आहे. रुग्णालय चालविण्याकरिता पाणीपट्टी कर, लाईट बिल, कर्मचारी वेतन, भाडे, परवाना खर्च याकरिता खर्च करावाच लागणार आहे आणि या कारणास्तव झालेला तोटा आपणास नफा-तोटा पत्रकामध्ये दिसून येत आहे.संस्थेने रुग्णालय भाडेतत्त्वावर चालू ठेवू नये असे सभासदांना वाटत असल्यास स्पष्टरित्या आपले मत मांडावे. संचालक भाडेतत्त्वावर रुग्णालय चालविण्याचा प्रयत्न करणार नाहीत.

सन्माननीय सभासद आयु. दुधेकर यांनी अहवालातील पान क्रमांक ५ मध्ये ज्या ठेवींचे विश्लेषण केलेले आहे, त्यात येस बँक चा उल्लेख आहे. येस बँक मध्ये रु.तीस लाखाची मुदत ठेव आहे, ती सेक्युअर आहे का? सेक्युअर असल्यास याबाबत संचालक मंडळ जबाबदारी घेणार का?

डॉ.आनंद जोगदंड यांनी प्रतिपादन केले की, येस बँक मध्ये जी मुदत ठेव ठेवलेली आहे ती सेक्युअर आहे. मुदत ठेवीच्या सिक्युरिटी ची जबाबदारी वैयक्तिकरित्या व सामुहिकरित्या संचालक मंडळाची आहे असे स्पष्ट नमुद केले.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी प्रतिपादन केले की, संस्थेला ठेवी ठेवण्याचा अधिकार फक्त शासकीय बँकेमध्ये आहे. आपण येस बँक मध्ये ठेवी ठेवू शकत नाही. रुपी बँक सारखी बँक एका रात्रीत बंद पडू शकते तर येस बँकेची तुम्ही जबाबदारी कशी घेऊ शकता? आपण कशाच्या आधारे मुदत ठेवीची छाती ठोकपणे जबाबदारी घेऊ शकता?

सभेचे अध्यक्ष प्रा.गौतम मगरे यांनी कृपया आपण प्रश्न विचारताना बोलण्याच्या स्वराचा विचार करावा असे भाष्य केले. यावर सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी याची दखल घेऊन माफी मागितली.

सन्माननीय सभासद यांनी प्रत्येक बँकेतील व्याजदराची विचारणा केली.

सभेचे अध्यक्ष प्रा.गौतम मगरे यांनी प्रतिपादन केले की, सभागृहातील सर्व सन्माननीय सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, संचालक मंडळ आपणास प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास बांधील आहे. परंतु याचा अर्थ असा नाही की आपण आवाजाचा स्वर वाढवून संचालक मंडळाचा अपमान करावा.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केलेले आहे की, संस्थेने केलेली गुंतवणूक सुरक्षित आहे. प्रचलित व्याजदर ज्या बँकांचे जास्तीचे आहेत त्याच बँकेमध्ये केलेली आहे. व्याजदर ठरविणे हे त्या त्या बँकेच्या धोरणाप्रमाणे ठरते. पुणे जिल्ह्यामध्ये ज्या बँका आहेत त्या बँकांचे व्याजदर मागविण्यात आले आणि त्याच्या आधारे ज्या बँकांचे व्याजदर जास्त आहे तसेच रिझर्व्ह बँकेचे प्रचलित निकष पालन करण्यात येत असलेल्या बँकेमध्ये आपण संस्थेच्या मुदत ठेवी ठेवलेल्या आहेत.याबाबत मागील सर्व साधारण सभेत ही चर्चा झालेली होती.

बोधिसत्व सहकारी रुग्णालय
बोधिसत्व
पुणे

दुसरी गोष्ट म्हणजे अश्या प्रकारे करण्यात आलेली गुंतवणूक भविष्यात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, याकरिता सर्वच रक्कम एकाच बँकेमध्ये मुदत ठेवीच्या स्वरूपात न ठेवता सहा बँकेत रक्कम विभागून ठेवण्यात आली आहे. जेणेकरून संस्थेचा निधी सेक्युअर असावा. मी आश्वासित करतो की,, संस्थेची जी काही गुंतवणूक केलेली आहे ती रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या निकषांनुसार, बँकेच्या पॅरामीटर्स ची तपासणी करून, तसेच संस्थेचे अध्यक्ष यांनी रिझर्व बँक ऑफ इंडिया,नाबार्ड मध्ये व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक म्हणून काम केलेल आहे. बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे अध्यक्ष यांनी वरील सर्व गोष्टींची तपासणी करून ही गुंतवणूक केलेली आहे व ती सुरक्षित आहे.

सन्मानीय सभासद आयु.संजय उबाळे यांनी असे मत मांडले की, संस्थेने गुंतवणूक ही शासकीय बँकेतच करावी बँकेच्या बाबतीत कोणत्याही गोष्टी घडू शकतात याची जबाबदारी एकमेव डॉ.आनंद जोगदंड यांनी का घ्यावी? असे जे शब्द डॉ.जोगदंड यांनी उच्चारले ते चुकीचे आहेत? सन्माननीय सभासद आयु. बळीराम बडेकर यांनी देखील संचालकांनी केलेली बँकेतील गुंतवणूक चुकीची आहे असे मत मांडले.सभेचे अध्यक्ष व डॉ.आनंद जोगदंड यांनी संचालक मंडळांनी केलेली गुंतवणूक ही योग्य आहे. संचालक मंडळाचा निर्णय योग्य आहे, याची संपूर्ण जबाबदारी संचालक मंडळाची आहे असे स्पष्ट केले.

सन्माननीय सभासद आयु.संजय उबाळे यांनी सभागृहासमोर विनंती केली की, सहकार खात्याच्या निर्देशाप्रमाणे संस्थेने आपल्या ठेवी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ठेवण्यात याव्या, यामध्ये संस्थेचा कोणताही तोटा नाही. संचालक मंडळ तज्ञ आहेत त्यांनी विचारपूर्वक निर्णय घेतले असतील संस्थेचे अध्यक्ष डॉ मोरेश्वर सुखदेवे यांच्या निर्णयावर कोणीही चुकीचे मत स्पष्ट केलेले नाही, परंतु सध्याच्या परिस्थितीत रात्रीतून बँका बंद पडतात त्यामुळे होणाऱ्या सभासदांचे नुकसान आम्ही समोरून पाहिले आहे. या कारणास्तव संस्थेने आपली गुंतवणूक ही राष्ट्रीयकृत बँकेत करावी अशी विनंती करण्यात येत आहे.

डॉ.आनंद जोगदंड यांनी आपल्या मुदत ठेवी बाबतीत व्यक्त केलेल्या मतांवर संचालक मंडळ विचार करेल व नियमानुसार संस्थेचे आर्थिक हित जपेल असे स्पष्ट केले.सन्माननीय सभासद आयु.ॲड.खरात यांनी संस्थेचे अर्थतज्ञ डॉ.मोरेश्वर सुखदेवे यांनी विचारपूर्वकच निर्णय घेतलेला आहे, यावर मी १०१ % विश्वास ठेवत आहे व जरी बँकेच्या बाबतीत काही झाले तरी बँक लिक्विडेशन मध्ये गेल्यावर संस्थेचे पैसे मिळणारच आहेत,असे मत स्पष्ट केले.

सन्माननीय सभासद आयु.रवींद्र बडेकर यांनी मागील अधिमंडळाच्या सभेचे इतिवृत्त पाहिले असल्यास मी मागील सभेत देखील यावर स्पष्ट केले होते की, संस्थेचे पैसे प्रायव्हेट बँकेमध्ये ठेवू नये सरकारी बँकेतच पैसे ठेवण्यात यावे त्यावेळी देखील याचा विचार करण्यात येईल असे सांगण्यात आले परंतु पुन्हा आजच्या सभेत हाच विषय आहे तर कृपा करून माननीय संचालकांनी वरील विषयाचा गांभीर्याने विचार करण्यात यावा असे स्पष्ट मत मांडले .

सन्माननीय सभासद आयु. मिलिंद माचले यांनी संस्थेने केलेली गुंतवणूक ही सर्व राष्ट्रीयकृत बँकेत केलेली आहे. केवळ एचडीएफसी व ऐस बँकेत केलेली गुंतवणूक ही प्रायव्हेट बँकेत आहे. या दोन्ही बँकेची खातरजमा केलेली असावी. संस्थेने केलेली गुंतवणूक ही योग्यच आहे. उर्वरित दोन बँकेचा विचार करून त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. कृपया सर्व सभासदांनी सामंजस्याने प्रश्न विचारावेत जर सभासदांना निर्णय योग्य वाटत नसल्यास संचालक मंडळ ते बदलतील. माझ्या मते वरील विषयाचे समाधान सर्व सभासदांचे झाले असेल असे प्रतिपादन केले.

सन्माननीय सभासद आयु. शरद जाधव यांनी जर ऐस बँकेमधील गुंतवणूकीबाबत मा. डॉ. आनंद जोगदंड यांनी जबाबदारी घेतली असल्यास त्याची नोंद इतिवृत्तामध्ये यावी असे मत मांडले.

सन्माननीय सभासद आयु. प्रबोध साळवी यांनी सूचना केली की, सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची संचालक मंडळाने समर्पक उत्तरे देण्यात यावी. निर्णय घेण्याचे अधिकार फक्त संचालक मंडळारा आहे. इतर सभासदांनी निर्णयामध्ये हस्तक्षेप करू नये किंवा एखादा प्रश्न विचारल्यास सर्व सभासदांना जर याच बाबतीत काही प्रश्न विचारायचे असतील तर विचारावे जेणेकरून सामूहिक प्रश्न विचारला जाईल व त्याचे समर्पक उत्तर दिले जाईल यास सभेचे अध्यक्ष मा. प्रा गौतम मगरे यांनी मान्यता दिली.

सन्माननीय सभासद आयु. रवींद्रनाथ बडेकर यांनी मी फक्त माहितीसाठी प्रश्न विचारत आहे. अहवालातील पान क्रमांक ८ मध्ये सांगितल्याप्रमाणे दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल करिता जे प्रमाणपत्र तयार करण्यात आले, ते हॉस्पिटलच्या नावे आहेत की, इतर डॉक्टरांच्या नावे आहेत याची माहिती देण्यात यावी.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे रुग्णालयाकरिता जे प्रमाणपत्र देण्यात आले, ते बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे संचलित दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल या नावे प्राप्त झाले आहे. परंतु याकरिता डॉक्टरांचे नाव द्यावे लागते म्हणून तत्कालीन संचालक डॉ.पी. टी. गायकवाड यांचे नाव देण्यात आले आहे.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी सूचना केली की, विषय क्रमांक दोन अहवालास मान्यता देण्याबाबत चे ठराव करण्यात आले आहेत ते ठराव सभेपुढे वाचून दाखवण्यात यावेत.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, वरील विषयावर जी काही साधक बाधक चर्चा झाली आहे. त्याची इतिवृत्तामध्ये नोंद घेऊन मग त्यावर काय ठराव झाला हे स्पष्ट केले जाते. इतिवृत्त आजच्या आज तयार होणार नाही. याची कृपया सभासदांनी नोंद घ्यावी.

मिटिंग कायद्याच्या तरतुदीप्रमाणे सभेचे इतिवृत्त लिहिले जाईल असे डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले.

**ठराव क्रमांक २ : संस्थेच्या ३१ मार्च २०२५ अखेरच्या वार्षिक अहवालास, बँकेतील गुंतवणूकीस डॉ.जोगदंड व सर्व संचालक हे वैयक्तिकरित्या व सामूहिकरीत्या जबाबदार आहेत. यासह वार्षिक अहवालास मान्यता आहे.**

**ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.**

सूचक: मा. रवींद्रनाथ बडेकर
अनुमोदक: मा. मिलिंद माचले.

**विषय क्रमांक ३ : ३१ मार्च २०२५ अखेरच्या उत्पन्न व खर्च पत्रक व ताळेबंद पत्रकास मान्यता देणे.**

संस्थेचे १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ च्या कालावधीचे नफा- तोटा पत्रक तसेच ३१ मार्च २०२५ रोजीचे ताळेबंद पत्रक अहवालामध्ये पान क्रमांक १४ व १५ मध्ये जोडले आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे असे सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी सभेत सांगितले.

सन्माननीय सभासद आयु.प्रा.जगदीश गाणार यांनी दापोडी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल करिता व टिंगरे नगर येथील कार्यालयाकरिता झालेला एकूण खर्च रु.५५,६८,४७०.४९ आहे.आर्थिक वर्षात संस्थेस रु. रु.५५,६८,४७०.४९ एवढा तोटा झालेला आहे आणि रुग्णालयामार्फत झालेले उत्पन्न रु. ८,९१,७४८.१४ एवढेच आहे.सरासरी पहाता संस्थेस एकूण रु.४६,७६,७२२.३५ तोटा झालेला आहे.संस्थेस झालेला एकूण तोटा रु.४६,७६,७२२.३५ असून संस्थेस प्राप्त झालेले मुदत ठेवीवरील व्याज, सभासद फी, दान वर्ग करून रु.१९,२६,०२५.०५ एवढा तोटा दर्शविला आहे कृपया याचे स्पष्टीकरण द्यावे.

प्रश्न क्रमांक दोन टिंगरे नगर येथे ओपीडी चालू नाही, परंतु तरी देखील येथील ऑफिस साठी रु.९,३१,०२५.०९ खर्च झालेला दिसत आहे. जर दापोडी रुग्णालयामध्ये जागा असल्यास टिंगरे नगर येथील कार्यालय दापोडी येथे स्थलांतरित करावे जेणेकरून संस्थेस होणारा खर्च कमी करता येईल.

रुग्णालय चालू झाल्यानंतर दोन-तीन महिन्यात नफा-तोटा पत्रक ताळेबंद पत्रक तयार करून झालेला तोटा सभासदांसमोर मांडला असता तर जेणेकरून आज झालेला तोटा कमी करता आला असता.

सन्माननीय सभासद आयु. बळीराम बडेकर यांनी आपले मत मांडले, सभेच्या विषय सूची नुसार सभासदांनी आपले प्रश्न २६ ऑगस्ट २०२५ पूर्वी संस्थेच्या कार्यालयात किंवा वेबसाईटवर किंवा व्हाट्सअप ग्रुप वर पाठविण्यात यावेत असे सुचित केले होते, त्यानुसार मी माझे प्रश्न सभेचे अध्यक्ष मा. प्रा. गौतम मगरे यांना त्यांच्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठविले होते, कारण मला मेल वर पाठविणे शक्य नव्हते परंतु त्याचे अद्याप काहीही उत्तर मिळालेले नाही. माझा मूळ प्रश्न असा होता की, टिंगरे नगर येथील व दापोडी येथील ३० बेडचे रुग्णालय चालू आहे का? बोधिसत्व सहकारी रुग्णालय सुरू करण्याचा मुख्य हेतू हाच आहे की आपल्या समाजासाठी स्वतःचे रुग्णालय असावे मग हे रुग्णालय चालू आहे की बंद आहे याचे स्पष्टीकरण देण्यात यावे?

सन्माननीय सभासद आयु. शंकर गायकवाड यांनी देखील देहूरोड येथील हॉस्पिटल संस्थेला भाडेतत्त्वावर मिळण्याकरिता प्रयत्न केला ते हॉस्पिटल तीन मजल्याचे आहे. हॉस्पिटलच्या मालकास तिसऱ्या मजल्यावर राहण्यास जागा देऊन पहिल्या दोन मजल्याचा वापर रुग्णालयास करता आला असता. आपण या हॉस्पिटल करिता रु. एक कोटी रुग्णालयाच्या मालकास देण्याचे ठरविले होते परंतु संचालकांनी याचा योग्य तो पाठपुरावा केला नाही व ते रुग्णालय आपल्या हातातून निघून गेले. आज जर ते हॉस्पिटल आपण घेतले असते तर खूप चांगल्या प्रकारे ते चालले असते असे माझे मत आहे.

अध्यक्ष मा.प्रा.गौतम मगरे यांनी स्पष्ट केले की, देहूरोड येथील रुग्णालयाच्या जवळपास असणाऱ्या डॉक्टरांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. जेणेकरून त्या रुग्णालयाला मॅनेज करण्याकरिता डॉक्टरांची आवश्यकता असते. परंतु डॉक्टर्स उपलब्ध होऊ न शकल्या कारणास्तव आपणास हे हॉस्पिटल भाडेतत्त्वावर घेणे शक्य झाले नाही. परंतु या सर्व प्रक्रियेमध्ये सन्माननीय सभासद आयु. शंकर गायकवाड यांनी खूप चांगल्या प्रकारे प्रयत्न केलेत याबाबत संस्था आपले आभार व्यक्त करत आहे.

सन्माननीय सभासद आयु.संदीप जांभुळकर यांच्या मते देहूरोड येथील रुग्णालय रु. ७५,०००/-प्रतिमाह भाडे व रु.१०,००,०००/-डिपॉझिट तत्त्वावर देण्याकरिता रुग्णालयाचे मालक तयार होते. काही संचालकांच्या मते ते हॉस्पिटल आपण भाडेतत्त्वावर न घेता रु. एक कोटी देऊन दानपत्र तयार करून रुग्णालय ताब्यात घेण्यात येईल. व मालकास तिसऱ्या मजल्यावर स्थलांतरित करता येईल असे मत मांडले. या कारणास्तव आपणास ते रुग्णालय प्राप्त झाले नाही. जर संस्थेस रुग्णालय भाडेतत्त्वावर घ्यायचेच नव्हते तर दापोडी रुग्णालय का घेण्यात आले?

सभेचे अध्यक्ष मा. प्रा. गौतम मगरे यांनी स्पष्ट केले की, देहु रुग्णालयासाठी डॉक्टर उपलब्धता नसल्याने घेतले नाही व संचालक मंडळातील डॉ.मंगल आयरेकर,डॉ.गायकवाड व डॉ.बेंडे यांचे असे मत होते की दापोडी रुग्णालय हे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या मध्यस्थानी आहे. सर्व सभासदांना मध्यबिंदू ठरणार आहे. त्याचा फायदा सर्व सभासदांना घेता येईल. आम्ही स्वतः त्या परिसरात आहेत.असा आग्रह माननीय संचालिका डॉ. मंगल आयरेकर, डॉ. उज्वला बेंडे, व तत्कालीन संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या आग्रहास्तव दापोडी रुग्णालय भाडेतत्त्वावर घेण्यात आले.

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. पुणे

देहुरोड येथील रुग्णालय हे फक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरातील सभासदांकरिताच जवळ झाले असते. परंतु दापोडी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल हे दोन्ही महानगरपालिकेच्या मध्यस्थानी असल्याकारणास्तव व वरील बाबींचा विचार करून डॉक्टरांच्या आग्रहास्तव दापोडी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल भाडेतत्त्वावर घेण्यात आले.

सन्माननीय सभासद आयु.संदीप जांभुळकर यांनी स्पष्ट केले की, पिंपरी चिंचवड मधील सभासदांनी जर देहूरोड येथील रुग्णालय संस्थेने भाडेतत्त्वावर घेतले असते तर २५ डिसेंबर ला पिंपरी चिंचवड येथील कार्यकर्त्यांकडून संस्थेस १००० नवीन सभासद देण्याचे आम्ही आश्वासन दिले होते परंतु अध्यक्ष त्यांच्या मतावर ठाम राहिले नाहीत. आज वस्तुस्थिती पाहता देहूरोड येथील रुग्णालयाचा प्रति महा १० लाख रु. उत्पन्न आहे. पिंपरी चिंचवडच्या कार्यकर्त्यांनी दिलेल्या शब्दावर आम्ही संस्थेस १००० नवीन सभासद दिले असते पण संचालकांनी त्या रुग्णालयाचा विचार केला नाही. या कारणास्तव आम्ही दिलेला शब्द पूर्ण केला नाही असे स्पष्ट संदीप जांभुळकर यांनी सभेत सांगितले.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी संस्थेत झालेला तोटा हा खूप मोठा आहे. तसेच सन्माननीय सभासद आयु.आनंद कांबळे यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर मा.अध्यक्ष यांनी सभेपुढे द्यावे तसेच दापोडी रुग्णालय व टिंगरे नगर येथील रुग्णालय बंद आहे त्याचे कारण द्यावे, संस्थेत झालेला तोटा भरून काढण्याकरिता आपण कोणते धोरण तयार करण्यात आहोत याबाबत माहिती सभागृहात पुढे देण्यात यावी. सध्याची परिस्थिती पाहता संचालक आणि सभासदांनी यांमधील नाळ तुटलेली आहे. संस्था स्थापन करण्यापूर्वी आपण ज्या पद्धतीने सभासद गोळा करण्याकरिता काम करत होतो. १ जानेवारी,१४ एप्रिल, २५ डिसेंबर रोजी वेगवेगळ्या शिबिराचे नियोजन करून संस्थेची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे वेगवेगळे प्रयत्न करत होतो शिबिरांचे आयोजन करत होतो परंतु अहवाल काळात पाहता फक्त एकच शिबिर पूर्ण वर्षभरात घेण्यात आलेले आहे. मागील दोन-तीन वर्षात संस्थेने किती शिबिरे घेतली आहेत याचा आढावा घ्यावा आपण नागरिकांपर्यंत पोहोचण्यात कुठेतरी कमी पडत आहोत. अशा परिस्थितीत आपल्याकडे सभासद कसे वाढतील. सभासद आणि संचालक यामधील जे अंतर वाढत चालले आहे त्याचा परिणाम आपणास अहवालामध्ये दिसून येत आहे. कृपया याचा विचार करण्यात यावा.

सभेचे अध्यक्ष प्रा गौतम मगरे यांनी सभागृहात दापोडीतील रूग्णालयात रुग्णांचा व सभासदांचा अत्यल्प प्रतिसाद होता. तोटा वाढु नये म्हणून दापोडी रुग्णालय बंद ठेवावे लागले असे स्पष्ट केले. डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. बेंडे,डॉ.आयरेकर दापोडीतील रूग्णालय चालुच ठेवणे बाबत आग्रही होते व रूग्णालय कामकाज जबाबदारी ही संचालक ठरावानुसार त्यांचेवरच होती.परंतु रूग्ण प्रतीसादा अभावी तोटा वाढतच चालला होता. संस्थेचा निधी यावर खर्च करू नये. असा ठराव पारीत करण्यात आला होता.संस्थेचा तोटा दिवसेंदिवस वाढतच आहे. यावर उपाय म्हणून डॉ. पी. टी गायकवाड यांना संचालकांनी दापोडी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल पूर्णवेळ चालविण्यास घ्यावे अशी विनंती केली. संचालक मंडळाने डॉ. पी. टी गायकवाड यांना विनंती केली की, आपण संचालक पदावरून कमी होऊन पूर्ण वेळ दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल चालवावे याकरिता लागणारे मानधन संस्थेकडून आपणास देण्यात येईल. आपण संचालक असल्यास उपविधीतील तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारचे मानधन संचालकास देता येत नाही. संचालक मंडळाच्या सभेमध्ये डॉ.पी. टी गायकवाड यांनी मी माझे मानधन किती असेल याची आपणास काही दिवसात कल्पना देतो. असे सांगितले परंतु डॉ.पी टी गायकवाड यांच्याकडून मानधनाची रक्कम स्पष्ट आजतागायत प्राप्त झाली नाही.

निवडणूक प्रक्रियेसाठी लागणाऱ्या संपूर्ण अटींची पूर्तता डॉ.पी.टी गायकवाड यांनी केली परंतु शेवटच्या क्षणी त्यांनी संचालक पदाकरिता अर्ज भरला नाही. बोधिसत्व सहकारी रुग्णालयाच्या निवडणूक प्रक्रिया सुरू असताना डॉ.पी. टी गायकवाड यांच्याकडून असे वक्तव्य

करण्यात आले की, मी संचालक पदी न राहता पूर्णवेळ दापोडी मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल पाहण्यास तयार आहे. त्याकरिता लागणारी मानधन व रुग्णालयाची संपूर्ण जबाबदारी मी स्वतः घेतो असे संचालकास स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डॉ.पी. टी गायकवाड यांनी संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.मोरेश्वर सुखदेवे यांना स्पष्ट केले की, मी दापोडी रुग्णालय पाहू शकणार नाही, कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेऊ शकत नाही. दापोडी रुग्णालय पाहण्याकरिता डॉक्टर्स उपलब्ध नव्हते, जून ,जुलै मध्ये रुग्णालयाचे उत्पन्न अगदी नगण्य झाले व खर्च मात्र आहे तसाच चालू होता. अशा परिस्थितीत रुग्णालय चालविणे योग्य आहे की बंद करणे योग्य राहील असा विचार करण्यात आला. दापोडी रुग्णालय बंद केल्यानंतर रुग्णालय चालविण्याकरिता नवीन डॉक्टर्स, नवीन कर्मचारी, मॅनेजमेंट इत्यादीची तपासणी करणे,माहिती गोळा करण्याचे कार्य संचालक मंडळांनी सुरू केले आहे.

वरील विषयावर गांभीर्याने विचार केल्यानंतर डॉ.आनंद जोगदंड यांनी पुन्हा स्पष्ट शब्दात सांगितले की दापोडी रुग्णालयाकरिता संस्थेचा निधी खर्च करू नयेत. रुग्णालय चालविण्याकरिता लागणाऱ्या रकमेची जोडणी ही संचालकांनी पुन्हा प्रत्येकी रु. एक लाख बिनव्याजी ठेव देऊन गोळा करण्यात यावी व या अनामत रकमेतूनच दापोडी रुग्णालय चालविण्यात यावे. डॉ.आनंद जोगदंड यांच्या मतास सर्व संचालकांनी मान्यता दिली व त्यानुसार ॲड अनिलकुमार दाबशेडे, डॉ.आनंद जोगदंड, डॉ.मोरेश्वर सुखदेवे, डॉ. सुरेश हनमंते, डॉ. बी. पी गायकवाड,आयु. कोते,यांनी प्रत्येकी रु.एक लाख संस्थेकडे अनामत स्वरूपात दिले आहे. दापोडी रुग्णालय चालविण्याकरता संचालक गांभीर्याने विचार करून तोटा कमीत कमी होईल व नफ्यामध्ये रुग्णालय कसे येईल यासाठी प्रयत्नशील आहेत. सभा अध्यक्ष यांनी सांगितले की, डॉ.आनंद जोगदंड संस्थेचे संचालक प्रत्येक दिवशी कमीत कमी एक शेअर्स वाढविण्यासाठी प्रयत्न करतात व यशस्वी होत आहेत. मागील तीन ते चार दिवसात डॉ.आनंद जोगदंड यांनी रु.७०,०००/-शेअर्सच्या माध्यमातून जमा केले आहेत. आज देखील सभेला येण्यापूर्वी एक नवीन सभासद केल्यानंतर सर सभेला आलेले आहेत. सन्माननीय सभासद येथे, संचालक म्हणून बसलेल्या संचालकांनी राज्यस्तरावर काम केलेले आहे. यांचा उपयोग संस्था चालविण्यासाठी कशा पद्धतीने होईल याचा विचार करून सर्व मान्यवरांना एकत्र करण्याचे कार्य माझ्या हातून घडून आणलेले आहे. सभागृहातील सन्माननीय सभासदांनी मा. संचालकांना प्रश्न विचारण्याचे पूर्ण अधिकार आहेत. परंतु संचालकांवर आरोप करण्याचे अधिकार नाहीत. संस्थेचा पैसा न खर्च करता रुग्णालय कसे चालवता येईल यासाठी सर्व संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.सन्माननीय सभासद आयु. साबळे यांनी संस्था स्थापन होण्याच्या पूर्वी, आपण प्रत्येक ठिकाणी वाड्या-वस्त्यांमध्ये छोट्या क्लिनिक पासून मग रुग्णालयाचा प्रवास गाठणार होतो असे ठरविले होते परंतु अशा कोणत्याही प्रकारचे कृत्य आपणाकडून झाले नाहीत. स्वतःमाझ्या ऑफिस जवळील जागा नाममात्र भाडेतत्त्वावर घेण्याकरिता डॉ. मोरेश्वर सुखदेवे यांना सुचविले होते. परंतु आज दोन वर्ष निघून गेले यावर कोणत्याही प्रकारचा विचार विनिमय झाला नाही. आपण आपल्या तत्त्वानुसार काम केल्यास वाड्या-वस्त्यांमध्ये छोट्या क्लिनिक पासून सुरुवात केली असती तर आपला प्रचार झाला असता, रुग्णप्राप्त आले असते, रुग्णांना सेवा मिळाली असती, सभासदां व्यतिरिक्त इतर रुग्णांना सेवा मिळाल्यानंतर ते देखील संस्थेचे सभासद झाले असते या माध्यमातून संस्थेचे सभासद देखील वाढले असते. डॉ.आनंद जोगदंड ज्या पद्धतीने प्रयत्नशील आहेत त्याच पद्धतीने इतर सर्व संचालक व सभासद यांनी प्रयत्नशील राहिल्यास संस्थेचे रुग्णालय नक्कीच स्थापन होईल असे स्पष्ट केले.

सन्माननीय सभासद सौ.अपर्णा शिंदे यांनी आपले मत सभागृहासमोर मांडले. बोधिसत्व सहकारी रुग्णालय चालविण्याकरिता सर्व संचालक प्रयत्नशील आहेत परंतु संचालक आणि सभासद यांच्यामध्ये असणाऱ्या दरीबाबत विचार करावा ,सभागृहात वादावादी करण्यापेक्षा रुग्णालय कशा पद्धतीने उभे राहील, रुग्णालय पुढे घेऊन जाण्याकरिता कोणते प्रयत्न करणे

गरजेचे आहेत याकरिता आपली मत द्या, याकरिता माझे स्वतःचे मत आहे की, बाहेरील कोणत्याही रुग्णालयात गेल्यावर ज्या पद्धतीचे पॅकेजेस मिळतात तशी काही व्यवस्था आपणास करता येईल का? याविषयी विचार करण्यात यावे. माझेच एक नातेवाईक मी दापोडी रुग्णालयामध्ये ऑपरेशन करिता पाठविले असता त्यांना रु.६०,०००/-अधिक रक्कमेचे कोटेशन देण्यात आले ,परंतु तेच ऑपरेशन बाहेरील रुग्णालयात रु ३०,०००/- अधिक रक्कमेचे कोटेशन मिळाले व त्या रुग्णाने बाहेरील रुग्णालयात ऑपरेशन करून घेतले

दोन्ही रक्कमेत बरीच तफावत आहे. आपले रुग्णालय सुरू करण्याकरिता तळागाळातील लोकांचा देखील विचार करून रक्कम ठरवावी. आपले रुग्णालय देखील तोट्यात जाऊ नये, या सगळ्या गोष्टींचा विचार करून रुग्णांना सेवा देण्यात यावी. याकरिता काही पॅकेजेस वगैरे तयार करणे शक्य होईल का? याबाबतीत विचार करण्यात यावा. पालिकेच्या योजना, गव्हर्मेंट च्या योजना, शासकीय योजनांचा आपणास काही फायदा करून घेता येईल का? याचा विचार करावा. रुग्ण आपल्याकडून पुन्हा इतर रुग्णालयात का जातो याचा विचार करून आपल्याकडून होणाऱ्या चुकांची दुरुस्ती करावी. अशी मी विनंती करत आहे.

सन्माननीय सभासद ॲड. खरात यांनी सहकारी संस्थेच्या नियमावलीनुसार सहकार खात्यात नफा तोटा पत्रक हा शब्द न वापरता ,जमा खर्च पत्रक वापरणे गरजेचे आहे. कॉर्पोरेट सेक्टरमध्ये नफा-तोटा पत्रक तयार केले जाते. सहकार खात्यानुसार जमाखर्च पत्र हा तयार होते. संस्थेने उपसमित्यांची नेमणूक करावी. त्यात सभासदांच्या कल्पनांचा विचार केला जाईल, यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देखील त्याच उपसमितीमधून मार्गी लागतील. सभासदांनी सुचवलेल्या कल्पनांवर संचालक मंडळाने योग्य तो निर्णय घेण्यात यावा. ज्याला संस्थेत काम करण्याची इच्छा आहे. अशा सभासदांना उप समित्यांमध्ये घेण्यात यावे. जेणेकरून सभासद आणि संचालकांमध्ये दरी कमी होऊ शकते व सभासदांना सर्व गोष्टींची स्पष्टता मिळू शकते.

डॉ.आनंद जोगदंड यांनी सभागृहात स्पष्ट केले की, पुणे, पिंपरी-चिंचवड परिसरामधून ओपीडी किंवा क्लिनीक सुरू करण्यासाठी येणाऱ्या कालावधीमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी सभासदांच्या सहकार्यातून प्रस्ताव प्राप्त होत असतील तर या प्रस्तावावर साधक-बाधक चर्चा करून यावर निश्चित विचार करण्यात येईल.

सन्माननीय सभासद आयु. पोपट भालेराव यांनी सभागृहासमोर काही सूचना केल्या. सर्वप्रथम सर्व सन्माननीय नवनिर्वाचित संचालक मंडळाचे अभिनंदन. प्रा. मगरे यांनी सांगितल्याप्रमाणे सभासदांनी दापोडी रुग्णालयाची सेवा घेतली नाही परंतु आपण हे रुग्णालय तळागाळातील रूग्ण व इतर नागरिकांकरिता करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून रुग्णालयाची स्थापना केली आहे. संस्थेने जे व्हाट्सअप ग्रुप तयार केलेले आहेत, या व्हाट्सअप ग्रुप मध्ये इतर गोष्टींचा भडीमार होत असतो याकरिता संस्थेने सभासदांचाच व्हाट्सअपचा एक ग्रुप तयार करून त्यामध्ये फक्त संस्थेचे सभासद असतील व संस्थेच्या कार्याबद्दल फक्त त्यामध्ये चर्चा विचारविनिमय करण्यात यावा असे सांगीतले .सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी सन्माननीय आयु. भालेराव यांनी केलेल्या सूचनांचा नक्कीच विचार केला जाईल. संस्थेचा एक ग्रुप तयार करून त्यावर संपूर्ण माहिती देण्यात येईल संस्थेची वेबसाईट तयार करण्यात आलेली आहे तसेच संस्थेचा यूट्यूब चैनल तयार करण्याच्या माध्यमातून प्रयत्नशील आहोत youtube च्या माध्यमातून संस्थेचा प्रचार प्रसार करता येईल.असे स्पष्ट केले.

सन्माननीय सभासद आयु. रवींद्रनाथ बडेकर यांनी सूचना केली की, संस्थेला झालेला तोटा हा अधिक आहे. या तोट्यातून बाहेर पडण्याकरिता संचालक मंडळाने ॲक्शन प्लॅन करावा त्या माध्यमातून कार्य करावे.

ठराव क्रमांक ३: १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ पर्यंतचा नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मान्यता आहे.

ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.

सुचक: मा. आनंद कांबळे
अनुमोदक: मा. रवींद्रनाथ बडेकर

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित बोधिसत्व पुणे

विषय क्रमांक ४ : ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रकमेचे विनीयोगास मान्यता देणे.

मा. अध्यक्षाने नमूद केले की, संस्थेचा वार्षिक जमाखर्च व ताळेबंद पत्रकानुसार अधिशेष (SURPLUS) निरंक आहेत, त्यामुळे विषय निरंक असल्याचे सांगण्यात आले.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी विषयसूचीमध्ये ३१ मार्च २०२५ अखेर शिल्लक रकमेचे विनियोगास मान्यता देणे. या ऐवजी ३१ मार्च २०२५ च्या नफ्याच्या विनियोगास मान्यता देणे असे असणे गरजेचे आहे, अशी सूचना केली.

ठराव क्र ४ :३१ मार्च २०२५ अखेर तोटा नसल्याने नफा विनियोग करणेचा प्रश्नच उद्भवत नाही.

ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते मंजूर.

सुचक: मा.संजय उबाळे
अनुमोदक: मा. ॲड खरात

विषय क्रमांक ५: ३१ मार्च २०२५ अखेरचे लेखा परीक्षण अहवालाची नोंद घेणे.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी विचारणा केली, लेखापरीक्षण अहवाल पुस्तिका पान क्रमांक १०,११,१२,१३ वर जोडलेला आहे. दुरुस्तीबाबत किंवा रुग्णालयाबाबत काही सूचना मांडण्यात आल्या आहेत का?

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, लेखापरीक्षण अहवाल बोधिसत्व रुग्णालयाच्या कार्यालयास दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी प्राप्त झाला आहे. लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करून कायद्यातील कलम ८२ नियम ७३ अन्वये त्याचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणार आहोत. ज्या सभासदांना लेखापरीक्षण अहवाल प्राप्त करायचा असल्यास त्यांनी वैयक्तिकरित्या देण्यात येईल. लेखापरीक्षण अहवाल हा नुकताच प्राप्त झालेला आहे याची कृपया सभासदांनी नोंद घ्यावी.

३१ मार्च २०२५ अखेरचे मे. माधव बोराडे अँड कंपनीने दिलेला लेखापरीक्षण अहवाल सभेत सादर करण्यात आला. अहवालानुसार संस्था तोट्यात आहे ,लेखापरीक्षण वर्ग ब देण्यात आल्याचे सांगण्यात आले. चर्चेअंती लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेण्याचे ठरविण्यात आले.

ठराव क्रमांक ५ : ३१ मार्च २०२५ अखेरचे लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेण्यास मान्यता आहे.

ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.

सूचक: मा. सदानंद कोचे
अनुमोदक: : मा.ए.सी खाडे

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. बोधिसत्व पुणे

**विषय क्रमांक ६: आधीच्या लेखापरीक्षणाचा दुरुस्ती अहवाल.**

सन २०२३-२४ चा दोष दुरुस्ती अहवाल कायद्यातील तरतुदी प्रमाणे अहवाल संबंधित लेखा परीक्षकाकडे पाठविण्यात आलेला आहे. संबंधित लेखापरीक्षकाकडून यावरील अभिप्राय अप्राप्त आहेत. दोष दुरुस्ती अहवालाची प्रत आवश्यक असल्यास उपलब्ध करून देण्यात येईल. संस्थेचे ३१ मार्च २०२४ चे लेखापरीक्षण अहवाल दुरुस्ती सादर करण्यात आली आणि लेखापरीक्षकाच्या निरीक्षणावर कार्यवाही करण्यात आली.
सदर अहवालास मान्यता देण्याचे ठरविण्यात आले.

**ठराव क्रमांक ६ : .३१ मार्च २०२४ च्या लेखापरीक्षणाच्या दुरुस्ती अहवालास मान्यता**

**ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.**

सुचक: मा.कमलेश हजारे
अनुमोदक:मा.निलेश भोरे

**विषय क्रमांक ७ : वार्षिक वर्ष २०२५-२६ च्या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पास मान्यता देणे.**

आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचे अर्थसंकल्प सभेत मांडण्यात आले.सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी अंदाजपत्रकाबाबत चर्चा करण्यास सुरुवात केली व सन २०२३-२४ चे अंदाजपत्रक विचारात घेऊन प्रश्न विचारण्यास सुरुवात केली असता, डॉ.आनंद जोगदंड यांनी आपणास अहवालाची प्रत देण्यात आलेली आहे. त्या अहवालातील पान क्रमांक १९ वर अधिकृत अंदाजपत्रक देण्यात आलेले आहे, कृपया या अंदाजपत्रकाचे अवलोकन करून प्रश्न विचारण्यात यावे ही विनंती आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ कर्मचाऱ्यांवरील खर्च हा रु.१८ लाख आहे व सन २०२५-२६ करिता अंदाजीत रु.२० लाख दर्शविले आहेत. यावर रकमेचे विश्लेषण डॉ.आनंद जोगदंड यांनी केले.

सन्माननीय सभासद आयु.डॉ.किशोर खिल्लारे यांनी अंदाजपत्रकातील लॅब चार्जेस यावर विचारणा केली असता, डॉ.आनंद जोगदंड यांनी रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांचे पैसे लॅब टेस्ट सोबत रुग्णालयात जमा होतात. ज्या लॅबमधून याची तपासणी केली जाते त्यांना देण्याकरिता लॅब चार्जेस तपशिलामध्ये दाखविले आहे.

उदाहरणार्थ दापोडी रुग्णालयाचे सबर्बन सोबत लॅब करिता टायअप झालेले आहे. रुग्णांनी दापोडी रुग्णालयात तपासणी केली असता त्याचे पैसे रुग्णालयात जमा होतात व महिनाअखेर सबर्बन च्या बिलानुसार त्या रकमेची पूर्तता सबर्बन ला करण्यात येते.आयु.डॉ. खिल्लारे यांनी संस्थेच्या अर्थसंकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर भाग भांडवल उभे करणे, वार्षिक वर्गणी, निधी गोळा करणे, दान इ. संस्थेच्या प्रकल्पासाठी लागणाऱ्या निधीची आवश्यकता विचारात घेऊन अर्थसंकल्पात तरतुदी केली असल्याचे नमूद करण्यात आले.डॉ.खिल्लारे यांनी सूचना केली की जर लॅब चार्जेस हा खर्च दाखवला असेल तर या मधून रुग्णालयास होणारा फायदा देखील दाखवणे गरजेचे आहे, त्यास डॉ.आनंद जोगदंड यांनी एकत्रीत उत्पन्नात याचा समावेश आहे असे स्पष्ट केले.

सन्माननीय सभासद आयु. जयद्रथ आखाडे यांनी अंदाजपत्रकातील तपशिलाप्रमाणे भाडे करिता रु.१४,३०,०००/-रक्कम दाखविण्यात आलेली आहे. ही रक्कम दापोडी व टिंगरे नगर येथील दोन्ही ठिकाणाचे भाडे मिळून आहे का? असल्यास टिंगरे नगर येथील ओपीडी बंद आहे मग तेथील जागा परत का करत नाही?

सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी टिंगरे नगर येथील ओपीडीची जागा ही संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय असल्या कारणास्तव आपल्याला ते कार्यालय बंद करता येत नाही. तसेच संस्थेस म्हाडा तर्फे जी जागा प्राप्त होणार आहे त्या जागेपासून कार्यालय थोड्या अंतरावर आहे.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की उपविधीतील तरतुदीप्रमाणे संस्थेचे अधिकृत कार्यालय हे टिंगरे नगर आहे या कारणास्तव ते बंद करता येत नाही. दापोडी रुग्णालयात संस्थेच्या कार्यालयाकरिता जागा उपलब्ध नाही.

आयु. डॉ.किशोर खिल्लारे यांनी लॅबवरील उत्पन्न अंदाजपत्रकात दाखवले नाही ते दाखवणे गरजेचे आहे असे स्पष्ट केले असता, डॉ.आनंद जोगदंड यांनी दापोडी येथील रुग्णालयातून प्राप्त होणारे उत्पन्न वेगवेगळे न दाखवता एकत्रित रित्या दापोडी रुग्णालय रु.३०,००,०००/-असे दर्शविले आहे.

सन्माननीय सभासद यांनी अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार जाहिरात प्रचार आणि प्रसार याकरिता रु. १ लाख अंदाजीत खर्च दाखविला आहे. मागील आर्थिक वर्षात हाच खर्च रु. ९०,०००/-होता म्हणजेच फक्त दहा हजार रुपयांनी वाढ होऊन आपण जाहिरात करणार आहोत का? सध्याची स्थिती पाहता रुग्णालयाची जाहिरात करणे अत्यंत आवश्यक आहे.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, हा फक्त आपण अंदाज दर्शविला आहे. अंदाजापेक्षा जास्त खर्च आपणास करता येऊ शकतो. दापोडी रुग्णालय हे पुढे बोधिसत्व चालवणार नाही याचे मॅनेजमेंट सुपूर्त करण्याचे चालू आहे.

सन्माननीय सभासद यांनी पुन्हा विचारणा केली म्हणजेच दापोडी रुग्णालय आपण ज्या मॅनेजमेंट कडे सुपूर्त करणार आहोत त्यांच्या उत्पन्नाचा आढावा घेऊनच अंदाजपत्रकातील रकमांची मांडणी केलेली आहे का? व्यवसायिक शुल्क म्हणजे काय ? यावर सभेचे अध्यक्ष यांनी होकार दर्शविला. डॉ.आनंद जोगदंड यांनी दापोडी रुग्णालय चालविण्याकरिता आपण ज्या कंपनीबरोबर एग्रीमेंट करणार आहोत, त्यानुसार दापोडी रुग्णालयाकरिता होणारा खर्च व उत्पन्न हे बोधिसत्व सहकारी रुग्णालया मार्फतच होणार आहे. उत्पन्न खात्यामध्ये जमा होणार व रूग्णालय खर्च ही खात्यातून होणार. कंपनीला एक ठराविक रक्कम देण्यात येणार आहे. या सर्व बाबींचा समावेश अंदाजपत्रकामध्ये केलेला आहे. अद्याप करारनामा झालेला नाही. प्रथम टप्प्यात याचे काम चालू आहे. सर्व माध्यमातून संस्थेस जास्तीत जास्त उत्पन्न कसे मिळेल याचा विचार करून करारनामा करण्यात येणार आहे.

मागील आर्थिक वर्षात दापोडी रुग्णालय चालवत असताना ज्या चुका झालेल्या आहेत. तसेच रुग्णालय चालू करण्याकरिता ज्या डॉक्टरांचा आग्रह होता त्याच डॉक्टरांचा पुन्हा दापोडी रुग्णालय चालू करण्याकरिता आग्रह असल्या कारणास्तव त्यांनी आणलेल्या व्यक्तीसोबत चर्चा प्रथम टप्प्यात चालू आहे. पूर्वी झालेल्या चुकांची पुनरावृत्ती होऊ नये याचा विचार करून नवीन मॅनेजमेंट सोबत करारनामा करण्यात येणार आहे. माझा आज देखील या रुग्णालय चालविण्याच्या मतास विरोध आहे. डॉक्टरांच्या आग्रहाखातीर तीन महिन्याच्या मुदती करिता ते रुग्णालय चालविण्यास देण्याचा प्रयत्न संचालक मंडळ करीत आहे. दापोडी रुग्णालय पुन्हा चालू करण्यासाठी संस्थेचा कोणताही खर्च होऊ नये याकरिताच संचालक मंडळांनी प्रत्येकी रु. एक लाख संस्थेस जमा करावेत व दापोडी रुग्णालय सुरू करावे असे ठाम मत मांडले व त्यास सर्व संचालकांनी अनुमती दर्शविली आहे. रुग्णालयासाठी दर महिना रु. ४-४.३० लाख खर्च होतो. अंदाजे तीन महिन्याचा खर्च १४-१५ होईल याकरिता १५ संचालकांनी रु. एक लाख देण्यात यावे व त्यातून रुग्णालय सुरू करावे असे ठरविण्यात आले. या प्रस्तावानुसार संस्थेचा कोणताही पैसा खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. रूग्णालय सुरळीत चालु राहीले ना नफा ना तोटा तत्त्वावर यश आले तर करार मुदत वाढ करणे बाबत निर्णय घेतला जाईल.

अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे रुग्णालयातील जागा मेडिकल स्टोअर ला रु. १८ लाख बिनव्याजी घेऊन देण्यात आलेली आहे. त्यांच्यामार्फत संस्थेस भाडे प्राप्त होते का ?डॉ.आनंद

जोगदंड यांनी स्पष्ट केले की मेडिकल स्टोअर मधून आपणास अद्याप भाडे मिळालेले नाही. कारण मेडिकल चाललेच नाही. परंतु बिनव्याजी रक्कम परत करताना भाडे वजा करून उर्वरित रक्कम मेडिकल स्टोअर च्या मालकास परत करण्यात येणार आहे.

सन्माननीय सभासद आयु. डॉ.बाळासाहेब कांबळे यांनी जर दापोडी रुग्णालय सुरू झाले तर याची कल्पना सभासदांना देण्यात येणार आहे का याची विचारणा केली.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की रुग्णालय सुरू झाल्यानंतर बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे व्हाट्सअप वरील ग्रुप मध्ये सर्व माहिती सभासदांना देण्यात येईल.संचालक मंडळातील सभेमध्ये दापोडी रुग्णालय बंद करण्याकरिता ठराव करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे जागा मालकास याची नोटीस देण्यात आली होती, परंतु सन्माननीय संचालिका यांच्या आग्रहास्तव रुग्णालय पुन्हा चालू करण्याकरिता प्रयत्न केले जात आहे.हा प्रयत्न तीन महिन्याकरिता असेल यात यश आले तर रुग्णालय पुढे चालू राहील अपयश आले तर रुग्णालय बंद केले जाईल.सन्माननीय सभासद डॉ.बाळासाहेब कांबळे यांनी जर आपण रुग्णालय बंद करणार आहोत तर पुढे काय चालू करणार असा प्रश्न सभागृहात विचारला असता? प्रा. गौतम मगरे यांनी भाडेतत्त्वावरील रुग्णालय बंद करून स्वतःचे रुग्णालय चालू करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे स्पष्ट केले.

संस्थेची स्थापना झाल्यानंतर ओपीडीचे उद्घाटन करतेवेळी बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे स्वतःचे स्वबळावर रुग्णालय उभे करणे हा मुख्य उद्देश होता. सन्माननीय सभासद आयु. गाणार व आयु. पोपट भालेराव यांनी ओपीडीच्या उद्घाटनाच्या वेळी संस्था २५% रक्कम जर रुग्णालयाकरिता लावत असेल तर ७५% रक्कम ही अनुदानातून (शासनाकडून)प्राप्त होईल असे स्पष्ट केले होते, त्याचे काय झाले? हे डॉ.आनंद जोगदंड यांनी स्वतःसभेपुढे मांडले होते.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्वतःचे रुग्णालय स्वबळावर उभे करावे म्हणजे काय याबाबत स्पष्टीकरण द्यावे? असे आयु. पोपट भालेराव यांनी सांगितले. यावर डॉ.जोगदंड यांनी स्पष्ट केले की माझी सुरुवातीपासून धारणा अशी आहे की संस्थेचे स्वबळावर रुग्णालय असावे. आपणास वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन रुग्णालय उभे करायचे आहे का?

सन्माननीय सभासद आयु. संजय बनसोडे यांनी वक्तव्य केले की, मा. जोगदंड सर यांनी शब्द दिला नसता की, तुम्ही पंचवीस टक्के रक्कम जमा करा उर्वरित रक्कम जमा करण्याची जबाबदारी माझी असेल तर कोणीही कार्यकर्ते सभासद गोळा करण्याकरिता फिरले नसते.

आपणाकडून १५ % रक्कम शेअर्सच्या माध्यमातून गोळा करण्यात यावी उर्वरित ८५% रक्कम शासनाकडून प्राप्त केली जाईल असे आश्वासन आपणाकडून सभासदास प्राप्त झाले होते .केवळ या कारणास्तव आम्ही समाजातून शेअर्स गोळा केले होते.

डॉ.जोगदंड यांनी स्पष्ट केले की, मी व्यक्तिशःकोणत्याही सभेत उपस्थित सभासदास शेअर्स साठी संपर्क केला नाही. आपणापर्यंत कोणते संचालक आले होते, याची मला कल्पना नाही. केंद्र सरकारची आयुष्यमान सहकार योजना आहे. परंतु या योजनेसाठी आपण पात्र ठरत नाही. कमीत कमी तीन वर्षानंतर आपणास प्रस्ताव द्यावा लागतो. परंतु प्रकल्प रकमेच्या १५% रक्कम जर आपणाकडे उपलब्ध असेल तर उर्वरित रक्कम आपणास योजनेतून प्राप्त करता येऊ शकते परंतु प्रकल्पाच्या १५% रक्कम आपल्या ताळेबंदामध्ये उपलब्ध असल्यास आपण एन सी डी सी कडे प्रकल्प सादर करू. या योजनेतून पैसे प्राप्त होतील किंवा नाही याची शाश्वती नाही. सध्या सरकार कोणाचे आहे याबाबत सर्वांना माहिती आहे. संचालक मंडळ प्रयत्न करत आहे. समाज कल्याण विभागामध्ये नवीन योजनाप्रस्तावित करण्याकरिता आम्ही तत्कालीन मा. आयुक्तांकडे प्रस्ताव दिला होता. मा.आयुक्तांनी हा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवला महाराष्ट्र शासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये संस्थेने बँकेकडून कर्ज घेऊन रुग्णालय उभे करावे अशी आपली धारणा असेल तर यास माझी सहमती नाही.

आयुष्यमान सहकार या योजनेचा लाभ घेण्याकरिता संस्था सातत्याने किमान तीन वर्षे नफ्यात असणे गरजेचे आहे. परंतु आपण नफ्यात नसल्या कारणास्तव या योजनेचा लाभ घेऊ शकत नाही. जेव्हा संस्था नफ्यात जाईल व प्रामुख्याने या संस्थेत जास्तीत जास्त अनुसूचित जातीतील सभासद असल्या कारणास्तव संस्थेची १५ % रक्कम असल्यास तर ८५% रक्कम संस्थेत प्राप्त होऊ शकते. त्या ८५% मधून १५% सबसिडी व उर्वरित ७०% रकमेची परतफेड करावी लागणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता आपली संस्था तीन वर्ष नफ्यात जाणे गरजेचे आहे. यातील आणखीन एक मुद्दा म्हणजे शहरी भागात ही योजना लागू नाही. ही योजना ग्रामीण भागात लागू आहे. तुम्हाला रुग्णालय स्थापन करायचे असल्यास आपण ग्रामीण भागात रुग्णालय स्थापन करावे लागेल पुणे व पिंपरी चिंचवड च्या ठिकाणी रुग्णालय स्थापन करण्याकरिता या योजनेचा लाभ घेता येणार नाही. योजना उपलब्ध नाही असे नाही योजना उपलब्ध आहेत पण केंद्र सरकारच्या निकषांचे पालन करणे देखील गरजेचे आहे. केंद्र सरकारच्या निकषांचे पालन करण्याकरिता आपण संस्थेचा निधी वाढवला पाहिजेत. या करिता सभासदाने कार्य करणे गरजेचे. आपणास केंद्र सरकारच्या अटी व नियमांचे पालन केल्याशिवाय या योजनेचा लाभ घेता येणे शक्य नाही.

मागील आर्थिक वर्षात संचालक मंडळ डॉ.आनंद जोगदंड यांच्या दापोडी रूग्णालय सुरू न करणे चे मतावर ठाम राहिले असते तर यावर्षी झालेला रु. १९ लाखतोटा झाला नसता. मी स्पष्ट केले होते की, पहिल्या वर्षी संस्थेस तोटा झाला होता. दुसऱ्या वर्षी संस्थेत नफा रु.३१,०००/- झाला. यावर्षी रूग्णालय चालवणेस घेऊ नये. फक्त निधी गोळा करावा.आपण नफ्यात राहु.मात्र माझा विरोध डावलून ज्या डॉ. संचालकांनी दापोडी रुग्णालय चालू करण्यासाठी अट्टाहास केला होता. त्यामुळे संस्थेस यावर्षी तोटा झाला आहे. तो अट्टाहास केला नसता तर यावर्षीही संस्था नफ्यात आली असती, पुढच्या वर्षी संस्था नफ्यात गेली असती तर त्याच्या पुढच्या वर्षी आपण शासकीय योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरलो असतो.आपणास शासकीय योजनेच्या अटी व नियमा प्रमाणे योजनेचा लाभ घेता आला असता.

सभागृहातील सर्व सभासदांना मी आश्वासित करतो की, यापुढे दापोडी रुग्णालयाकरिता संस्थेचा एकही रुपया खर्च होणार नाही याची संचालक मंडळाने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. माझ्या एकट्याचा विरोध संचालक मंडळासमोर डावलला गेला तर मी एकटा त्याला जबाबदार राहणार नाही हे मी सर्वसाधारण सभेत स्पष्ट करत आहे.

सभागृहातील सभासदांनी प्रश्नांची विचारणा केली की, असा ठराव मागील सर्वसाधारण सभेमध्ये देखील सांगण्यात आला होता मग संस्थेचे पैसे दापोडी रुग्णालयावर का खर्च झाले, यावर संचालक डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, याचे उत्तर ज्या डॉक्टरांनी रुग्णालय चालविण्याचा अट्टाहास केला त्याकरिता खर्च केला त्यांनी याचे स्पष्टीकरण द्यावे.
ज्या डॉ.संचालकांनी दापोडी रुग्णालय सुरू करण्याकरिता अट्टाहास केला होता ते संचालक सध्या संचालक मंडळात नाहीत उर्वरित दोन डॉ.संचालिका व एक संचालक मंडळात आहेत...

सन्माननीय संचालक प्राध्यापक राठोड यांनी बोधिसत्व सहकारी रुग्णालय ही संकल्पना खूप चांगली आहे. मा. जोगदंड सरांचा विरोध असताना देखील दापोडी रुग्णालयाची सुरुवात झाली व त्यातून संस्थेला मोठ्या प्रमाणामध्ये तोटा सहन करावा लागला तर माझे असे मत आहे की, जर भाग भांडवलाच्या काही टक्के रक्कमच आपण खर्च करू शकतो त्याच्यापुढे जाऊ नये असे जर आपण ठाम केले तर होणाऱ्या तोट्याला आळा बसू शकतो. त्याकरिता एखादा ठराव करून संचालक मंडळांनी भाग भांडवलाच्या पाच टक्के - दहा टक्के एवढीच रक्कम वापरण्याचे अधिकार देण्यात यावे. त्यामुळे होणारा मोठा तोटा निश्चितच आटोक्यात येऊ शकतो.

डॉ.आनंद जोगदंड यांनी वरील मतास पूर्णपणे विरोध असल्याचे स्पष्ट केले. संस्थेचा कोणताही निधी न वापरता दापोडी रुग्णालय चालवायचे असल्यास त्यांनी चालवावे. संचालक मंडळाच्या ठरावानुसार दापोडी रुग्णालयास प्रत्येक संचालका ने रु. एक लाख देण्यात यावे,असे

ठरल्याप्रमाणे मी माझा शेअर्स सर्वात प्रथम दिलेला आहे. मी माझी जबाबदारी पूर्णपणे पार पाडलेली आहे. परंतु संस्थेचा एक रुपयाही या वर्षी दापोडी रुग्णालयास खर्च होणार नाही या गोष्टीची दक्षता घेतल्यास होणारा तोटा आटोक्यात येईल नाहीतर आज १९ लाख तोटा दिसत आहे उद्या तो रु.२५ ते रु.३० लाख होऊ शकतो.

या अनुषंगाने आज आपण निश्चित करायचे आहे की, आपणास दापोडी रुग्णालय चालू ठेवायचे आहे की नाही, माझे भाष्य हे अंदाजपत्रकावरच आहे सभागृहातील सभासदांनी फक्त खर्चावरच प्रश्न विचारले आहे. उत्पन्नावर एकाही सभासदाने प्रश्न विचारलेला नाही याकरिता मला सभागृहात याविषयी बोलायचे आहे.

सन्माननीय सभासद आयु. गाणार यांनी सभासद फी व भाग भांडवल यावर प्रश्न विचारला,डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की,मागील वार्षिक वर्षात रु.१,४७,०००/-सभासद फी प्राप्त झाली आहे. अंदाजपत्रकात हीच रक्कम रु.२०,००,०००/-दाखविण्यात आलेली आहे. याच अनुषंगाने आपणास चालू आर्थिक वर्षात आपणास अंदाजपत्रकातील रकमेनुसार नुसार नवीन सभासद करावयाचे आहेत व त्याच माध्यमातून आपली भाग भांडवल देखील वाढणार आहे. वार्षिक वर्गणी याबाबत रु.१,९०,००,०००/-. संस्थेच्या उपविधीतील तरतुदीनुसार संस्थेचा जन्म झाल्यापासून सभासदाने वार्षिक वर्गणी प्रत्येक वर्षी रु.२०००/-भरणे अनिवार्य आहे. ही वार्षिक वर्गणी मागील चार वर्षापासून थकीत आहे. संस्थेचे १९७१ सभासद आहेत. प्रत्येकाचे मागील पाच वर्षापासून रु.दहा हजार प्रमाणे एकूण थकीत वार्षिक वर्गणी रु.१,९०,००,०००/-ही अंदाजीत रक्कम आहे. वरील रकमेची तरतूद संस्थेच्या उपविधीमध्ये आहे. उपविधी मान्यताप्राप्त आहे व ही रक्कम भरणे कायद्याने अनिवार्य आहे. त्याकरिता यास उत्पन्नाचे स्तोत्र मानले गेले आहे. ही थकीत रक्कम आहे. थकीत रक्कम दाखवणे गरजेचे आहे आणि त्याच प्रमाणे ही रक्कम अंदाजपत्रकात दाखवण्यात आली आहे.

सन्माननीय सभासद आयु.पोपट भालेराव यांनी सभागृहात स्पष्ट केले की, अधिमंडळाच्या दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये रु.दोन हजार वार्षिक वर्गणी ही वगळण्यात येत आहे असे ठरविण्यात आले होते.

डॉ.आनंद जोगदंड यांनी यावर अधिमंडळाच्या दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वार्षिक वर्गणी वगळण्यात न येता एका भागाची रक्कम रु.५०००/-वरून रु.१०,०००/- करण्यात येणार होती, यावरील ठराव रद्द करून एका भागाची रक्कम रु.५०००/-च ठेवण्यात यावी असे ठरविण्यात आले होते.हे सभागृहात स्पष्ट केले.

सन्माननीय सभासद आयु. पोपट भालेराव यांनी असे भाष्य केले की, अधिमंडळाच्या दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत जर वार्षिक वर्गणी भरण्यास सभासद तयार नसतील तर मी डॉ.आनंद जोगदंड राजीनामा देत आहे असे आपण सभागृहात भाष्य केले असल्याचे सांगितले. परंतु डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, मी जर एका भागाची किंमत रु.५०००/-वरून रु.१०,०००/-होणार नसेल तर संस्थेकडे निधी उत्पन्न होणार नाही याकरिता मी राजीनामा देत आहे असे माझे भाष्य होते.

भागांची रक्कम वाढविण्यात यावी यावर हा विषय सध्या बाजूला ठेवण्यात यावा नंतर यावर चर्चा करण्यात येईल असे स्पष्ट करून हा विषय अधिमंडळाच्या दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत चर्चे करिता बाजूला ठेवण्यात आला होता.

सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी स्पष्ट केले की,अधिमंडळाच्या दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालिका आयुमती रंजना कांबळे यांचेकडून सूचना करण्यात आली होती, की भागांची रक्कम न वाढवता प्रत्येक सभासदाने एक नवीन सभासद करावा व स्वतःएक भाग नवीन खरेदी करावा असे ठरविण्यात आले होते. यास आयुमती रंजना कांबळे व ॲड. खरात यांनी अनुमती दिली.

डॉ.आनंद जोगदंड यांनी उपविधीतील तरतुदीनुसार व नियमानुसार प्रत्येक सभासदाने प्रत्येकी रु.२०००/-प्रति वर्षी प्रमाणे वार्षिक वर्गणी भरणे अनिवार्य आहे. प्रत्येक सभासदाने वार्षिक वर्गणी भरावी असे मी जाहीर आवाहन करतो.

अधिमंडळाच्या तिसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये प्रत्येक सभासदाने एक नवीन सभासद व एक अतिरिक्त शेअर्स घेण्याचे आवाहन करण्यात आले होते व ठराव केला होता या अटीवरच एका भागाची किंमत रु.५०००/-वरून रु.१०,०००/-न करण्याचे ठरविण्यात आले होते.वरील दोन्ही बाबींचा विचार केल्यास संस्थेकडे निधीची उपलब्धता अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे होऊन संस्थेचे स्वप्न साकारण्यास मदत होईल. परंतु वरील बाबींचा विचार न झाल्यास संस्थेचे स्वप्न पूर्ण होणार नाही याची मी तुम्हास खात्री देतो.

सन्माननीय सभासद आयु. मिलिंद मावले यांनी सभेपुढे आव्हान केले की, अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे संस्थेचे ११०७ सभासद ज्यांनी एक भाग खरेदी केलेला आहे, त्यांनी अतिरिक्त एक भाग घेण्यात यावे व वार्षिक वर्गणी भरण्यात यावी यास माझी अनुमती आहे. मी माझे स्वतःचे पैसे संस्थेत जमा करणार आहे.

सन्माननीय सभासद आयु.गाणार यांनी आपण फक्त त्याच त्याच सभासदांकडून शेअर्सची रक्कम वाढवून घेण्याकरिता संभाषण करत आहोत, परंतु रुग्णसंख्या कशी वाढेल व त्यामधून रुग्णालयाचे उत्पन्न कसे वाढेल याबाबत कोणत्याही प्रकारची चर्चा होत नाही. संस्थेचे आज एकूण १९७१ सभासद आहे त्याच सभासदांना पुन्हा रकमेची मागणी करायची वार्षिक वर्गणीची मागणी करायची हे योग्य नाही, त्या सभासदांकडून रक्कम गोळा करायची व संस्थेमध्ये तोट्यात घालवायची यास कुठेतरी बांध घातला पाहिजे. रुग्ण संख्या वाढविण्यासाठी आपण काय करणार आहोत, याबाबत चर्चा करण्यात यावी. सभासदांनी एकदा रक्कम भरल्यानंतर ती रक्कम वाढवण्याची जबाबदारी संचालकांकडे दिलेली असते, परंतु संचालक ती रक्कम तोट्यात घातल्यास पुन्हा रक्कमेची मागणी कशी करतात. सभासद एकदा रक्कम भरून पुन्हा गेलेली रक्कमेचा विचार न करता स्वतःची सामाजिक बांधिलकी म्हणून ती रक्कम विसरून जातात. परंतु अशा प्रकारे संस्था चालवणे योग्य आहे का? त्यात सभासदांकडून रक्कमेची मागणी न करता रुग्णालयाचे रुग्ण कशा पद्धतीने वाढतील, त्याची जाहिरात मोठ्या प्रमाणात कशी होईल याकडे संचालकाने लक्ष द्यावे माझे मत आहे.

सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी भाष्य केले की, सभागृहात उपस्थित सभासद ज्या आत्मीयतेने तळमळीने काही प्रश्नांची विचारणा करत आहेत जसे की, आयु. रवींद्रनाथ बडेकर, आयु. गानार , आयु. मिलिंद माचले, आयु. बळीराम बडेकर, आयु. संजय उबाळे यांना संस्थेप्रती, रुग्णालयाप्रती आत्मीयता, रुग्णालय वाढीसाठी चे स्वप्न याकरिताच आपणाकडून प्रश्न उपस्थित होत आहेत .ज्या सभासदांनी पोट तिडके ने आपल्या बाबी सभेपुढे मांडलेले आहेत त्यांना या प्रक्रियेमध्ये एकत्र करून समाजामध्ये कशा पद्धतीने काम करता येईल यावर एकत्र येऊन काम करण्याचे धोरण निश्चितच ठरवण्यात येईल. या अनुषंगाने मी सभागृहाला आश्वासित करत आहे. मी सभेचा अध्यक्ष प्रा. गौतम मगरे आपणास सूचित करतो की, आयु. रवींद्र बडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करून रुग्णालय वाढीकरिता प्रयत्न केले जातील. येणाऱ्या काळामध्ये सभासद वाढीकरिता तसेच रुग्ण वाढी करिता ह्या समितीचे सहाय्य घेतले जाईल.

सर्व सभासद यांनी उपविधीतील तरतुदीनुसार वर्गणी भरणा करणे, अनिवार्य राहील तसेच अधिमंडळ बैठकीत ठराव केले प्रमाणे एक नवीन सभासद जोडणेस व एक नवीन शेअर्स घेणे सभासद कर्तव्य पार पाडावे.वैयक्तिक मतापेक्षा सामुहिक मत तसेच कायदा ,नियम पालन करण अपेक्षित आहे.

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. बोधिसत्व पुणे

**ठराव क्र.७: वार्षिक वर्ष २०२५-२६ च्या आर्थिक वर्षासाठीच्या अर्थसंकल्पास अहवालात दिलेल्या परिशिष्ट नुसार मान्यता आहे.**

ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.

सूचक: मा. विजय खरात
अनुमोदक: मा. प्रोफेसर धिवरे

विषय क्रमांक ८ : आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.

मे. माधव बोराडे अँड कंपनीनेकडून आर्थिक वर्ष २०२५-२६ लेखापरीक्षणासाठी पत्र प्राप्त झाले असून ते लेखापरीक्षक म्हणून काम करण्यास उत्सुक आहेत. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन मे. माधव बोराडे अँड कंपनी यांना वित्तीय वर्ष २०२५ -२६ साठी लेखापरीक्षक म्हणून रु. १५०००/-मानधनावर नेमणूक करण्यास मान्यता देण्याचे ठरविण्यात आले.

**ठराव क्रमांक ८ : मे. माधव बोराडे अँड कंपनी यांची आर्थिक वर्ष २०२५ -२६ साठी लेखापरीक्षक म्हणून तसेच त्यांना मानधन रु.१५,०००/-देण्यास मान्यता देण्याचे ठरविण्यात आले.**
ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते चर्चेअंती मंजूर.

सूचक: सौ.माधवी भारस्कर
अनुमोदक: सौ. रंजनानितनवरे

विषय क्रमांक ९ : म्हाडा कडून जागेचे आवंटन,निधीचे नियोजन व जागा खरेदीस मान्यता देणे.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी सभागृहात उपस्थित २०० सभासद तसेच उर्वरित १७०० सभासदांना जर आपण रुग्णालयाकरिता स्वतंत्री जागा खरेदी करण्याचा विचार करत असाल त्यास आम्हा सर्व सभासदांचा आपणास पाठिंबा असेल. विषयास मी अनुमती देत आहे असे स्पष्ट केले. वरील विषयास अनुसरून सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी भाष्य केले की, आपल्या माहितीकरिता स्पष्ट करितो की डॉ.बी पी गायकवाड संचालक हे महाराष्ट्र राज्याचे जॉइन्ट डायरेक्टर आरोग्य क्षेत्रात कार्यरत होते. त्यांनी म्हाडा बद्दल ची जबाबदारी स्वीकारली आहे.डॉ.आनंद जोगदंड प्रशासकीय पातळीवर प्रयत्न करत आहेत.तसेच आपणास जी म्हाडाची रु.२,१८,००,०००/-ची रक्कम ठरलेली आहे. ती देखील म्हाडास इन्स्टॉलमेंटच्या स्वरूपात देण्यासाठी चे प्रयत्न करीत आहोत. येत्या काळात बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे स्वतःचे रुग्णालय असण्याचे स्वप्न आपण सत्यात उतरवण्याचा प्रयत्न करणार आहोत.

डॉ.आनंद जोगदंड यांच्या प्रयत्नामुळेच म्हाडाची बीड आपण यशस्वीरित्या पार पाडली त्यास एक वर्षाचा कालावधी निघून गेलेला आहे. आपणास कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार म्हाडाच्या कार्यालयातून झालेला नाही. ऑफर पत्र अद्यापही प्राप्त झालेले नाही. ऑफर पत्र का थांबण्यात आले आहे, याची कोणतीही माहिती आपणास प्राप्त नाही. परंतु हे ऑफर पत्र मिळवण्यासाठी आता आपण सर्वतोपरी प्रयत्न करून, मदत घेऊन हे कार्य पूर्ण करण्याचे ठरविले आहे. आणि ही जबाबदारी रुग्णालयाचे संचालक डॉ.बी पी गायकवाड यांनी स्वीकारलेली आहे. यासंदर्भात म्हाडाच्या कार्यालयात जे शक्य आहे, तितके पर्यंत संचालक मंडळ नक्कीच करणार आहे. परंतु जर यश प्राप्त झाले नाही तर पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण २० जागा संचालक मंडळाने पाहिले आहेत. या २० जागांपैकी ३ जागा

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. बोधिसत्व पुणे

रुग्णालयासाठी योग्य वाटत असल्यामुळे त्याचा पत्रव्यवहार पुणे महानगरपालिके सोबत करण्यात आलेला आहे. परंतु प्रशासक असल्याकारणास्तव त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही या दोन जागें व्यतिरिक्त जर काहीच प्राप्त होणार नसेल तर खाजगी जागा विकत घेण्याचा प्रयत्न केला जाईल. परंतु जागा विकत घेतली तरच पुढे निधी गोळा होईल अशी संचालकांची धारण आहे. अशी माझी धारणा नाही. परंतु संचालकांची आहे जागा उपलब्ध झाली तर मग निधी मोठ्या प्रमाणात गोळा करू असे त्यांचे स्पष्ट मत आहे. परंतु माझे निधी गोळा करण्याचे कार्य सातत्याने चालू आहे. या दोन माध्यमातून जे जे प्रयत्न करणे शक्य आहे ते सर्व प्रयत्न संचालक मंडळ करीत आहे

सध्या एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. आता संचालक मंडळांनी या संबंधित पाठपुरावा करण्याची जबाबदारी संचालक डॉ.बी.पी गायकवाड यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. आणि प्रशासकीय पातळीवर मी यांचा पाठपुरावा करणार आहे. पुणे महानगरपालिकेच्या जागे संदर्भात काय निर्णय होईल याची सध्या कोणतीही कल्पना नाही परंतु त्या प्रसंगी देखील या जागांना मंत्रालयातून च परवानगी मिळवावी अशी चर्चा मागील सभेमध्येच झाली आहे. समजा आपणास म्हाडाकडून आवंटन पत्र मिळाले तर रु.२,१८,००,०००/-ची आवश्यकता आहे. त्याकरिता नोंदणी शुल्क, करारनामा करिता रु. ६० लाखाची आवश्यकता आहे व वरील सर्व रक्कम संस्थेकडे उपलब्ध नाही. म्हणजेच म्हाडाच्या जागे करिता संस्थेकडे किमान रु.२,७५,००,०००/-ची आवश्यकताआहे. ही रक्कम आपल्या तिजोरीत आवश्यक आहे. सध्या आपल्याकडे रु.१,७०,००,०००/- आहेत. उद्या समजा जागेचे अवंटन पत्र मिळवले. त्यांनी आपल्याकडे वरील सर्व रकमेची मागणी केली व आपल्याकडे पैसे उपलब्ध नसल्यास त्या जागेचे व्यवहार रद्द केले तर याकरिता आपण सर्व जबाबदार असणार आहेत. याकरिता मी आपल्याला आवाहन करत आहे की, ठरावाप्रमाणे एक नवीन मेंबर बनवा,एक वाढीव भाग घ्या, उपविधीतील तरतुदीनुसार वार्षिक वर्गणीचा भरणा करा. या माध्यमातून आपण रु. ३,९०,००,०००/- उभे करू शकतो व जर जागेचे आवंटन पत्र मिळाले तर आपणास ती रक्कम भरणे शक्य होईल. याकरता निधी उभारणे गरजेचे आहे व हीच सर्वांची प्राथमिकता हवी.

सर्व सन्माननीय सभासदांनी फुल न फुलाची पाकळी देऊन स्वबळावर रुग्णालय उभे करायचे ठरवल्यास आपणास केंद्र सरकारच्या योजनेची गरज पडणार नाही. त्याकरिता स्वबळावर निधी गोळा करणे गरजेचे आहे. स्वबळावर निधी न जमा झाल्यास आपण केंद्रीय योजनेत निधी साठी भविष्यात विचार करू. प्रस्ताव पाठवला आणि तो मंजूरच होईल असे नाही ती प्रक्रिया आहे. म्हाडाच्या बिडींगमध्ये ६४०० स्क्वेअर फिट चा प्लॉट बिडिंग केला. परंतु म्हाडास भरण्याची रक्कम देखील आपल्याकडे उपलब्ध नाही, या कारणास्तव संचालक मंडळाने म्हाडाकडे आवश्यक त्या पद्धतीने पाठपुरावा केलेला नाही. सन्माननीय सभासदांना आपले स्वतःचे रुग्णालय स्वबळावर सुरू करावयाचे असल्यास अंदाजपत्रकातील उत्पन्नाच्या दोन बाबींवर जास्तीत जास्त भर देऊन निधी गोळा केला, तरच म्हणजेच ज्या पद्धतीने मी स्वतःनिधी गोळा करण्यासाठी कार्यान्वित आहे. त्याच पद्धतीने प्रत्येक सभासदाने कार्यान्वित झाल्यास आपले स्वप्न साकार होणार. परंतु या प्रक्रियेत आपण कोणताही प्रयत्न न करता अशा प्रकारची भूमिका मांडणार असताल की मी एकदा पैसे दिले आता मी पुन्हा काही करणार नाही तर आपले रुग्णालय उभे राहणार नाही. जर सभासदांना वाटत असेल की, आपल्या समाजातील बांधवांसाठी कमी दरामध्ये आपल्या स्वतःचे रुग्णालय चालू करायचे आहे ,तर या प्रक्रियेत प्रत्येक सभासदाने सहभाग घेणे, कार्यान्वित असणे गरजेचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, आपल्या उत्पन्नाचा २० वा भाग समाजकारणासाठी वापरा जर हे समाजकारण आपल्यासाठी असेल तर विसावा भाग नाही तर कमीत कमी एक भाग तरी द्या.

सर्व सभासदांनी एकदा पैसे दिले म्हणजे जबाबदारी संपली आणि सर्व जबाबदारी फक्त संचालकांची आहे तर असे नाही. संचालकांनी सर्व कामे करायची व सभासदांनी फक्त त्यांना

येऊन वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये प्रश्न विचारायचे असे जर होणार असेल तर तर हे संघटन चालणार नाही. मी ह्याला बोधिसत्व सहकारी रुग्णालय समजत नाही, मी याला समाज बांधवांचे एक यशस्वी संघटन समजतो. या संघटनाच्या माध्यमातून जर आपल्याला आपला उत्कर्ष करावयाचा असल्यास बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या उत्पन्नाचा विसावा भाग या समाजकारणासाठी लावा. फक्त या प्रकल्पासाठी नाही तर इतर प्रकल्पासाठी देखील आपण याचा वापर करू शकतो .

सहकार तत्वामध्ये लाईफ मेंबर्स असा कोणताही प्रकार नाही. रु. २०००/-वार्षिक वर्गणी देणे कायद्याने बंधनकारक आहे. पण शेअर्स घेणे व नवीन सभासद आणणे हे कायद्याने बंधनकारक नाही. सामाजिक चळवळीमध्ये पोट तिडकीने जर आपणास वाटत असेल की, आपले रुग्णालय तयार व्हावे तर मात्र आपणास एक नवीन सभासद आणायचा आहे व एक अतिरिक्त शेअर्स घेण्यात यावे. जर अध्यक्ष साहेब या गोष्टी होणार असतील तरच मी डॉ.आनंद जोगदंड आपल्या सोबत आहे. नाहीतर या प्रकल्पात मी आपल्या सोबत नाही.

प्रा गौतम मगरे यांनी सभागृहात डॉ.आनंद जोगदंड ज्या पोट तिडकीने संस्थेसाठी कार्य करत आहे. डॉ.आनंद जोगदंड यांनी सांगितलेल्या प्रकल्पात सर्व संचालक मंडळ त्यांच्यासोबत कार्य करण्यास तयार आहे. सर्व संचालकांनी प्रत्येकी रु. १,००,०००/-तर दिलेलेच आहेत, परंतु आपल्या परिजनातील जास्तीत जास्त नागरिकांना संस्थेचे सभासद करण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

प्रत्येक संचालकाने, प्रत्येक सभासदांनी या विषयाचा गांभीर्याने विचार करून आपल्या कार्यास स्वप्नास पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असावे.संस्थेमार्फत समाज कल्याण विभागाला जशा इतर विभागाला योजना आहेत तशाच सहकारी रुग्णालयाला योजना अनुदान स्वरूपात, शेअर्स कॅपिटल्स स्वरूपात किंवा कर्ज स्वरूपात असो अशा प्रकारचे एक स्ट्रक्चर म्हणजे योजना तयार केलेली आहे. शासनाकडे पाठवली आहे. या योजनेची फलद्रूप होण्याची जबाबदारी आपले संचालक ॲड. दाबशेडे सर यांच्याकडे सोपविण्यात आलेली आहे. सन्माननीय सभासद प्रा. दिलीप लोखंडे यांनी सभागृहात डॉ.आनंद जोगदंड यांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत. एक अतिरिक्त शेअर्स खरेदी करायचा व एक नवीन सभासद गोळा करायचा ही एक छान कल्पना आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा जो विकास झालेला आहे तो सहकारातूनच झालेला आहे. जेवढ्या बँका आहेत. साखर कारखाने आहेत. यांच्या माध्यमातून सहकारातूनच महाराष्ट्राचा विकास झालेला आहे. आपल्या सहकारी संस्था नाहीत. फक्त १% पण संस्था नसतील. हे जे आपण छोटेसे रोपटे लावलेले आहे ते रोपटे पुण्यात उभे केलेले आहे. ही खूप चांगली संकल्पना आहे. त्यांना आपण सर्वांनी खांद्यावर उचलून घेतले पाहिजे. थोडा आर्थिक त्रास होणार आहे. माझी शेअर्स खरेदी करण्याची क्षमता नाही परंतु तरीदेखील मी एक शेअर्स घेतला आहे व आता जोगदंड सरांनी सांगितलेल्या कल्पनेनुसार आणखीन एक अतिरिक्त शेअर्स घेण्याकरिता मी प्रयत्न करीन व माझ्या एखाद्या मित्राला नवीन सभासद नक्कीच संस्थेसाठी तयार करील. आजच एका मित्राने फॉर्म घेऊन येण्यास सांगितले आहे. हे रोपटे चालू झालेले आहे ते थांबवू नका बऱ्याच वेळापासून खूप नकारात्मक गोष्टी या संदर्भात बोलल्या जात आहे. आपले रोपटे कसे वाढेल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, यामध्ये आडकाठी आणू नये. संचालकांनी आपणास नफा तोटा पत्रक मागील तीन वर्षाचे दिलेले आहे. पहिल्या वर्षी तोटा दुसऱ्या वर्षी नफा तिसऱ्या वर्षी पुन्हा तोटा हा झालेला तोटा आपल्याला भरून काढायचा असेल तर सर्वांनी एकजूट होऊन कार्य करणे खूप गरजेचे आहे तरच आपले हे रोपटे उद्या झाड होईल व आपण पाहिलेले स्वप्न साकार होणार आहे. सरांनी बोलल्याप्रमाणे म्हाडाची जागा आपणास मिळेल की नाही याची देखील शाश्वती नाही. सध्या सरकार कोणाचे आहे कशा पद्धतीने काम चालू आहे याबाबत आपणा सर्वांना उघडपणे सांगणे गरजेचे नाही याबाबत आपण ज्ञात आहात.आपण समाज कल्याण विभागाकडे प्रस्ताव दिलेला आहे. तो मान्य होईलच असे नाही,पण यांवर अवलंबून न राहता आपण स्वतः एकजूट

होऊन कार्य केल्यास आपले स्वतःचे रुग्णालय उभे राहणे अशक्य नाही. सामाजिक बांधिलकी म्हणून आपण रु. ५०००/-देखील देऊ शकत नाही का? हा प्रश्न आपण स्वतःच विचारावा? आपणास विनंती करतो की, मा.आनंद जोगदंड यांनी सांगितलेल्या संकल्पनेत आपण पूर्ण करण्याचा एकजुटीने प्रयत्न करावा. ही आपणा सर्वांस विनंती आहे.

डॉ. आनंद जोगदंड यांनी सभागृहात स्पष्ट केले की, संस्थेस तोटा झाला आहे याचे आकलन केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, तोटा हा दापोडी रुग्णालयामुळे झालेला आहे ,रुग्णालयासाठी बराच खर्च झालेला आहे, परंतु जर वार्षिक वर्गणी आपणास त्याच वेळी प्राप्त झाली असती, नवीन शेअर्स आले असते. या माध्यमातून जमा होणारा उत्पन्नाचा भाग, सभासद फी व वर्गणी हा तोटा आज झाला नसता हे उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे तोटा दिसलाच नसता.दुसरे कारण असे आहे की, सभासदाने एक नवीन शेअर्स घेणे, एक नवीन सभासद करणे, वार्षिक वर्गणी देणे या वार्षिक सभेतील ठरावाप्रमाणे सर्व सभासद व संचालक यांनी काम केले नाही या बाबीकडे मी वैयक्तिकरित्या सोडून सर्व सभासद व संचालक दोषी आहे. कोणत्याही संचालकाने नवीन सभासद जोडणे किंवा अतिरिक्त शेअर्स घेणे यामध्ये कवडीचेही कॉन्ट्रीब्युशन नाही. दापोडी रुग्णालय चालू झाल्यामुळे सर्व संचालकांचे दुर्लक्ष निधी गोळा करणे, सभासद गोळा करणे यावर झाले. निधी जमाच झाला नाही.नवीन सभासद गोळा झाले असते, वार्षिक वर्गणी जमा झाली असती तर जो तोटा दिसत आहे तो दिसला नसता. यावर्षी देखील आपण प्रॉफिटमध्ये असतो.

माझे असे म्हणणे आहे की,या चुका जाणून-बुजून केलेल्या आहेत. याला काही ठराविक लोक जबाबदार आहेत. हेच जर दुर्लक्ष झाले नसते तर सर्व संचालकांनी जे ४५ दिवसात १ कोटी ४५ लाख जमा केले होते, त्यांनी गेल्या तीन वर्षात किती भाग भांडवल जमा केले असते ? दापोडी रुग्णालय चालू केले आणी निधी गोळा करण्याकडे दुर्लक्ष केले एकही रुपया जमा केला नाही. जे काही उत्पन्न निधीमधून प्राप्त झाले आहे ते फक्त आणि फक्त मी केलेल्या नवीन सभासद व अतिरिक्त शेअर्स यामधूनच प्राप्त झालेले आहे.

आपणा समोर जे ताळेबंद पत्र दिलेले आहे, त्या ताळेबंद पत्रकाची एकूण बेरीज रु.२ कोटी २७ लाख आहे. यातील रु.३५ लाख शेअर्सच्या,दान,वर्गणी च्या माध्यमातून मी एकट्याने जमा केले आहे. म्हणजेच एकूण जमा झालेल्या निधीमधील २०% वाटा हा माझ्या एकट्याचा आहे. उर्वरित इतर संचालकांनी कमीत कमी दोन ते तीन टक्के जरी निधी गोळा करण्यास मदत केली असती तर हा वाटा ५०% पर्यंत जाणे सहज शक्य झाले असते. आणि आज आपणास हा तोटा सहन करावा लागला नसता. मात्र सध्या लोकशाही आहे.

**ठराव क्र.९. म्हाडा ची जागा खरेदीस मान्यता आहे.**
**ठराव वरील प्रमाणे सर्वानुमते मंजूर**

सूचक : आयु. प्रा.दिलीप लोखंडे
अनुमोदक: आयु. जयंत वानखेडे

**विषय क्रमांक १० : संस्थेचे स्वतःचे हॉस्पिटल उभारण्यासाठी चे नियोजन, निधी गोळा करणे. म्हाडाची जागा न मिळाल्यास खुल्या बाजारातून जागा खरेदी करणेस मान्यता देणे**

वरील प्रमाणे सर्व चर्चा जागे संदर्भात विषय क्रमांक ९ मध्ये झालेली आहे.

ठराव क्र.१० :म्हाडा ची जागा,महानगरपालिकेची जागा मिळणेस प्रयत्न करूनही जागा मिळत नसल्यास विहीत पध्दतीचा अवलंब करून खाजगी जागा खरेदीस मान्यताआहे.

वरीलप्रमाणे सर्वानुमते ठराव मंजूर.

सुचक:आयु. अशोक भगत
अनुमोदक:आयु. प्रकाश गाडे.

**विषय क्रमांक ११ : संस्थेच्या उपविधीमध्ये करावयाच्या दुरुस्त्यांना मान्यता देणे.**

प्रा. गौतम मगरे यांनी स्पष्ट केले की, उपविधीतील तरतूदी मध्ये ज्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत, त्या संस्थेच्या हिताच्या दृष्टिकोनातूनच अत्यंत तज्ञ मार्गदर्शकाने या दुरुस्त्या सुचवल्या आहेत.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी अनु क्रमांक ४ मध्ये आपण जी दुरुस्ती सुचवली आहे, त्यामध्ये संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण पुणे जिल्हा आणि सोलापूर जिल्हा या दोन जिल्ह्यांच्या भौगोलिक सीमेपुरता मर्यादित राहील अशी दुरुस्ती केली आहे. परंतु यामध्ये जर सोलापूर जिल्ह्यासोबतच पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्हे यामध्ये समाविष्ट करावे.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, आपणास एका विभागाचे कार्यक्षेत्र मिळत नाही. सध्या आपल्याला एक जिल्हा आहे तर दुसऱ्या जिल्ह्याचा प्रस्ताव नियमाप्रमाणे द्यावा लागेल, पुढच्या वर्षी विभागाचा प्रस्ताव द्यावा लागेल, त्याच्या पुढच्या वर्षी राज्याचा प्रस्ताव द्यावा लागेल ,असे टप्प्याटप्प्यानेच पुढे कार्यक्षेत्र वाढ वावे लागेल.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी आपणास विभागाचा प्रस्ताव देता येतो असे सांगितले, परंतु डॉ.आनंद जोगदंड यांनी आपणास असणारी माहिती चुकीची आहे असे प्रतिपादन केले. सभेचे अध्यक्ष प्रा. गौतम मगरे यांनी स्पष्ट केले की,सन २२-२३ च्या अधिमंडळाच्या सर्वसाधारण सभेत ठराव पारित करण्यात आला होता की, संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड भौगोलिक सीमेपुरते मर्यादित न राहता ते संपूर्ण पुणे जिल्हा भौगोलिक सीमेपुरते मर्यादित राहील असा ठराव पारित करून संस्थेचे कार्यक्षेत्र वाढविले होते. सहकाराचे विभागीय मंडळ पुणे व सोलापूर हे एकत्र असल्यामुळे आपण संस्थेच्या कार्यक्षेत्रात सोलापूर जिल्ह्या ची मान्यता घेणेस, उपविधी दुरूस्त करत आहोत. सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे यांनी केलेल्या सूचनेनुसार पुढील वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचे कार्यक्षेत्र हे पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा समावेश करणे बाबत संचालक मंडळात विचार करणेत येईल.

डॉ.आनंद जोगदंड यांनी स्पष्ट केले की, आपणास जर पश्चिम महाराष्ट्र कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट करावयाचा असल्यास, पश्चिम महाराष्ट्र कार्यक्षेत्रामध्ये मिळणार नाही .कारण पश्चिम महाराष्ट्रामध्ये दोन जॉईंट रजिस्ट्रार कार्यरत आहेत. तुम्ही यास महसूल विभागासारखे समजू नये. सहकार विभागाची प्रशासकीय यंत्रणा ही वेगळी आहे. पुणे आणि सोलापूर जिल्ह्याचा हा एक विभाग आहे. सांगली, सातारा व सोलापूर हा वेगळा विभाग आहे. ही सहकार विभागाची यंत्रणा आहे महसूल विभागाची नाही. महसूल विभागाप्रमाणे आपणास जाणे शक्य नाही.

सन्माननीय सभासद आयु. संजय उबाळे आयु. रवींद्रनाथ बडेकर,आयु. संजय बनसोडे व आयु. संदीप जांभुळक यांनी संचालक मंडळ रचनेत बदल करू नये व विरोध नोंद केला.यावर यांच्या विरोधाची नोंद घेउन बहुमताने संचालक मंडळ प्रस्तावित दुरूस्ती मान्यता सभेत मंजूर करण्यात आली.

ठराव क्र.११.प्रस्तावित सर्व उपविधी दुरूस्ती बहुमताने मंजूर
वरीलप्रमाणे सर्वानुमते ठराव मंजूर.

सूचक : आयु. निलेश भोरे
अनुमोदक: आयु. एस बी.पाटील

विषय क्रमांक १२ :मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने सभेपुढे आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे

ऐनवेळीच्या विषय चर्चेसाठी न आल्यामुळे डॉ. बी. पी गायकवाड यांनीउपस्थितीत सभासदांचे आभार मानले व भविष्यात सभासदांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त करू न सभा संपल्याचे जाहीर केले.

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्या. बोधिसत्व पुणे

मा.गौतम मगरे
उपाध्यक्ष
बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे